रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ८६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹

## गावरस्त्यांना मिळणार नंबर

**मुंबई :** राज्यातील प्रमुख राज्यमार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गांना जसे विशिष्ट क्रमांक देण्यात येतात, तसेच आता गावरस्त्यांतील रस्त्यांनाही क्रमांक दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील प्रत्येक गावरस्त्याला, पांदण रस्त्यांनाही अधिकृत क्रमांक मिळणार असून, महसूल विभागाच्यावतीने हा अभिनव उपक्रम राबवला जात आहे. भूमिअभिलेख अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक यांच्या समन्वयातून ही मोहीम राबवली जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांवरील अतिक्रमण रोखण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

## सप्टेंबरमध्ये १५ दिवस बँका बंद

**मुंबई :** सप्टेंबर महिन्यात बँका तब्बल १५ दिवस बंद राहतील. या महिन्यात ओणम, दुर्गा पूजा, ईद-ए-मिलाद आणि नवरात्र अशा अनेक सणांमुळं बँका बंद राहणार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेल्या सुट्ट्यांच्या यादीनुसार सप्टेंबर महिन्यात अनेक राज्यांमध्ये बँका १५ दिवस बंद राहतील. दरम्यान, देशभरात एकाच दिवशी बँका बंद राहणार नाहीत. तर, प्रत्येक राज्यात वेगळवेगळ्या प्रसंगी सुट्ट्या असतात. फक्त राष्ट्रीय सुट्ट्यांच्या दिवशीच बँका एकाच वेळी देशभर बंद असतात. परंतु, १५ दिवस बँका जरी बंद असल्या, तरी ऑनलाईन सर्व व्यवहार सुरू राहतील, असे रिझर्व्ह बँकेने सांगितले आहे.

### वे|ध|क

## दोन दहशतवाद्यांना केली अटक

**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात पोलिसांनी दोन दहशतवाद्यांना अटक केली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, छापेमारीदरम्यान तारिक शेख आणि रियाझ अहमद यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून दोन असॉल्ट रायफल आणि दारुगोळा जप्त करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी तारिक शेखच्या घरावर छापा टाकला अन् रिजाझ अहमदसह त्याला अटक केली. तसेच, जालियन गावात असलेल्या त्याच्या भाड्याच्या घरातून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. हे दोघेही या शस्त्रांच्या मदतीने मोठी घटना घडवण्याच्या तयारीत होते.

## शेतकरी उतरणार पुन्हा रस्त्यावर

**मुंबई :** गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर परिस्थितीमुळे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. जर सरकारने कांद्याला किमान १,००० रुपये प्रतिक्विंटल अनुदान दिले नाही आणि येत्या काळात कांद्याचे बाजारभाव किमान ३,००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचले नाहीत, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळेंनी राज्य सरकारला दिला आहे.

## एअर इंडियाच्या विमानाला आग

**नवी दिल्ली :** एअर इंडियाच्या रविवारी सकाळी दिल्लीहून इंदूरला निघालेल्या विमानाला टेकऑफ करतानाच आग लागली. विमानाच्या उजव्या बाजूला असलेल्या इंजिनला आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर पायलटने वेळ न घालवता याची माहिती अधिकाऱ्यांना दिली आणि तात्काळ लँडिंगची परवानगी मागितली. त्यानंतर लगेचच विमानाची लँडिंग दिल्ली विमानतळावर करण्यात आली. एअर इंडियाच्या फ्लाइट क्रमांक २९१३ मध्ये हा तांत्रिक बिघाड झाला होता. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. त्यानंतर प्रवाशांना सुरक्षित विमानाच्या बाहेर काढण्यात आले.

# कर्करोगाशी झुंज अपयशी!

## अभिनेत्री प्रिया मराठेचे अवघ्या ३८ व्या वर्षी निधन



**मराठी, हिंदी सिनेसृष्टीवर शोककळा**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

'पवित्र रिश्ता' आणि 'तुझेच मी गीत गात आहे' या लोकप्रिय मालिकांमधून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री प्रिया मराठे हिचे कर्करोगामुळे निधन झाले आहे. वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी तिने अखेरचा श्वास घेतला. रविवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास प्रियाची प्राणज्योत मालवली. तिच्या निधनाची बातमी समोर आल्याने मराठी आणि हिंदी कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.

२००६ साली आलेल्या झी मराठीवरील 'या सुखांनो या' या मालिकेतून अभिनयाला सुरुवात केली होती. त्यानंतर चार दिवस सासूचे, तू तिथे मी या मराठी मालिकेतही तिने काम केलं होतं. त्यानंतर पवित्र रिश्ता, बडे अच्छे लगते है या हिंदी मालिकांध्येही प्रियाने आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली होती.

### प्रकृतीच्या कारणामुळे सोडली होती मालिका

प्रियाने अखेरची भूमिका 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकेत साकारली होती. मात्र, काही महिन्यांपूर्वी तिने ही मालिका अचानक सोडली होती. त्यावेळी तिने आपल्या चाहत्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे हा निर्णय घेतल्याचे सांगितले होते. शूटिंगचं वेळापत्रक आणि माझ्या आरोग्याचा समतोल साधणं कठीण होतं, त्यामुळे मी मोनिकाची भूमिका सोडत आहे, असं तिने म्हटलं होतं.

### कलाविश्वातील प्रवास

प्रिया मराठेने आपल्या अभिनयाची सुरुवात 'या सुखांनो या' या मराठी मालिकेतून केली होती. त्यानंतर तिने 'चार दिवस सासूचे' यांसारख्या अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केले. हिंदी मालिकांमध्येही तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली. 'कसम से' या मालिकेतून त्यांनी हिंदी टेलिव्हिजनमध्ये पदार्पण केले. एकता कपूरच्या गाजलेल्या पवित्र रिश्तामध्ये तिने वर्षाची भूमिका साकारली, जी खूप गाजली. याशिवाय, 'बडे अच्छे लगते है'मध्येही तिने ज्योती मल्होत्रा ही भूमिका साकारली होती.

# नागोठणे पोलिसांना गुंडांचा लळा?

**पोलीस ठाण्यात गुंडांची ऊठबस वाढली?**

**गुन्हेगारासोबत पोलीस ठाण्यात केक कापून वाढदिवस साजरा**

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत राजरोसपणे अवैध धंदे सुरू असून, पोलिसांचे कारवाईकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. मात्र, एका मोठ्या गुन्ह्यात सहभागील आरोपी गुंडाला पाठीशी घालण्याचा प्रकार नागोठणे पोलीस ठाण्यात घडत असल्याचे समजते. या गुंडाची पोलीस ठाण्यात ऊठबस वाढल्याचे बोलले जात आहे. या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीचा पोलिसांनी आपल्या केबिनमध्ये केक कापून वाढदिवस साजरा केल्याचे समजते. गुंडांचा पोलीस ठाण्यात वावर वाढत असताना प्रभारी पोलीस अधिकारी का पाठीशी घालत आहेत, याबाबत उलटसुलट चर्चा नागोठण्यात रंगली आहे. या गुंडाचा नागोठणे पोलिसांना एवढा लळा का? असा प्रश्न नागोठणेकरांना पडला आहे. रायगडच्या पोलीस अधीक्षकांनी या गंभीर घटनेची दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.




### साहेब, आपल्या सहकाऱ्यांना विचारा...

साहेब, आम्हाला तुम्हाला एकच विचारायचे आहे की, नागोठण्यात व परिसरात विविध अवैध धंद्याच्या बाबतीत सर्व काही सुरळीत आहे, हे तुम्ही छातीठोकपणे सांगू शकाल का? तुम्ही जर खरोखर याबाबतीत अनभिज्ञ असाल, तर तुमच्या हाताखालील कर्मचाऱ्यांना विचारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुठे काय-काय चालले आहे ते? आणि जे काही अवैध धंदे सुरु आहेत, त्याचे पुरावे पत्रकारांनी आणून द्यायचे असतील, तर तुम्हाला का द्यायचे? पुरावे द्यायचे झाले तर कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांना आम्ही देऊ. तसेच पूर्वी अवैध धंद्याची बातमी आली तर त्या बातमीचा सन्मान करून, त्या बातमीची दखल घेऊन या अवैध धंद्याचा शोध घेण्याचे काम पोलीस यंत्रणा करीत होती व संबंधितांवर कारवाई करीत होती. मग आता अवैध धंद्याची बातमी प्रसिद्ध झाली तर या अवैध धंद्याचा शोध घेण्याचे काम पोलीस प्रशासनाचे की पत्रकारांचे?

नागोठणे परिसरात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेले असूनही जिल्ह्यात शांतताप्रिय म्हणून ओळख असलेल्या व दोन वर्षांपूर्वी स्मार्ट पोलीस ठाणे झालेल्या नागोठणे •➤ पान २ वर

### पुरावे पोलीस अधीक्षकांना देऊ

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाण्याच्या बैठकीत बोलताना अवैध धंदा दिसला तर सोडणार नाही, असे भाष्य केलेल्या येथील प्रभारी अधिकाऱ्यांची तीच हेडलाइन काही वर्तमानपत्रांनी केली होती. मात्र, आता दोन दिवसांपूर्वी नागोठण्यात चालणाऱ्या अवैध मोबाईल मटक्याचे वृत्त कृषीवलने देताच येथील प्रभारी अधिकाऱ्यांना त्याचे पुरावे पाहिजे आहेत. ''याबाबत पुरावे असल्यास सादर करावेत, तात्काळ कारवाई करण्यात येईल'' असा एक संदेश येथील प्रभारी अधिकाऱ्यांनी नागोठण्यातील त्या संबंधित समाज माध्यम समूहावर कृषीवलच्या बातमीला टॅग करून टाकला आहे. पुरावे द्यायचे झाले तर पोलीस अधीक्षकांना आम्ही देऊ, असे पत्रकारांचे म्हणणे आहे.**

# आरोपी बापाचा बनाव चिमुकलीमुळे उघड

- **पत्नीला रॉकेल ओतून पेटवून देत ठार मारले**
- **नराधमाला उरण पोलिसांनी ठोकल्या बेड्या**

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याच्या संशयावरून पतीने पत्नीला रॉकेल ओतून पेटवून दिले. पत्नीने जाळून घेत आत्महत्या केल्याचा केलेला बनाव प्रत्यक्ष साक्षीदार ठरलेल्या सात वर्षांच्या मुलीनेच उघड केल्याने उरण पोलिसांनी पलायनाच्या तयारीत असलेल्या पती राम शिरोमणी शाहू (३५) या नराधमाला अटक केली आहे.

कंटेनर ट्रेलरवर चालक म्हणून काम करणारा राम शिरोमणी शाहू (३५) मूळ राहाणार मध्य प्रदेश हा आपली पत्नी जगराणी शाहू (३५) आणि सात वर्षांच्या मुलीबरोबर पागोटे -उरण येथे भाड्याने खोली घेऊन राहात होता. पत्नी जंगराणी हिचे विवाहबाह्य संबंध असल्याच्या संशयावरून पती-पत्नीमध्ये नेहमीच भांडणे सुरू होती. २५ ऑगस्ट रोजीही रात्री पती-पत्नी यांच्यात विवाहबाह्य संबंधांच्या संशयावरून कडाक्याचे भांडण झाले.संशयाचे भूत डोक्यात शिरलेल्या नराधम आरोपीने रागाच्या भरात पत्नीला खोलीत बंद करून तोंडात बोळा कोंबून, हातपाय बांधले. त्यानंतर रॉकेल अंगावर ओतून लायटरने पेटवून दिले. यामध्ये दुर्दैवाने पत्नीचा भाजून मृत्यू झाला होता. यादरम्यान आरोपीने पत्नीने स्वतःच जाळून घेत आत्महत्या केल्याचा बनाव पतीने रचला होता. त्यामुळे उरण पोलिसांनी पतीच्या •➤ पान २ वर

## सोनपावलांनी आली गौराई...



● गणरायाच्या आगमनानंतर पाच दिवसांनी घरोघरी गौराई विराजमान झाली आहे. 'आली आली गौर आली, सोन्याच्या पावलांनी आली, सुखसमृद्धी घेऊन आली...' म्हणत रांगोळीचा सडा आणि लक्ष्मीची पावले काढत महिलांनी गौराईचे स्वागत केले. (छायाचित्र : समीर मालोदे)

# सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांची फसवणूक



- **शमरॉक एंटरप्रायजेसचे मालक, साथीदारांवर होणार गुन्हा दाखल**
- **उच्च न्यायालयाचे पाली पोलिसांना आदेश**

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील शेतकरी पांडुरंग लिंबाजी तेलंगे व इतर शेतकरी यांची मे. शमरॉक एंटरप्रायजेसचे मालक कल्पेश खोखानी व त्याचा साथीदार अशोक भारती यांनी फसवणूक करून अपरिमित नुकसान केले होते. त्यांच्यावर उच्च न्यायालयाने गुन्हा नोंद करण्याचे आदेश नुकतेच दिले आहेत, असे शेतकरी पांडुरंग लिंबाजी तेलंगे व इतर शेतकरी यांनी सांगितले. या फसवणूक संदर्भात •➤ पान २ वर

# आदिवासी कुटुंबाला मारहाण

- **नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करुन अटक**
- **न्यायालयाकडून पाच दिवसांची पोलीस कोठडी**

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील भालगाव येथील आदिवासीवाडीत वास्तव्य करणाऱ्या एका आदिवासी कुटुंबातील पाच जणांना मारहाण करणाऱ्या नऊ जणांविरोधात मुरुड पोलीस ठाण्यात रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आधी सहा जणांना, त्यानंतर तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### क्षुल्लक कारणावरुन वादाची ठिणगी

**भालगाव आदिवासीवाडीत राहणारा सुमित मिठागर येथे राहणाऱ्या मुलीच्या घरी गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी गेल्याचा राग मनात धरुन आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, मुरुड पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे अधिकचा तपास करीत आहेत.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, रोहा तालुक्यातील भालगाव येथील आदिवासी वाडीत राहणारा कातकरी समाजाचा असणारा सुमित मंगेश वाघमारे हा मिठागर येथील एका मुलीच्या सोबत तिच्या घरी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी गेला होता. या गोष्टीचा मनात राग धरुन मिठागर येथील नऊ जणांनी २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.४५ वाजण्याच्या दरम्यान जमाव जमवून भालगाव येथील आदिवासी वाडी येथील रस्त्यावर येऊन मंगेश महादेव वाघमारे यांना हाताबुक्क्याने व लाथेने मारहाण केली, तसेच त्यांची पत्नी संगिता, मुलगा साहिल व काका चंदर श्रावण वाघमारे यांच्या डाव्या हातावर मारहाण केली. तसेच चुलत भाऊ राम चंदर वाघमारे यांच्या डोक्यावर तसेच त्यांचा मुलगा सागर याच्या उजव्या पायाच्या पोटरीवर चाकूने वार करुन गंभीर दुखापत करण्यात आली. ही माहिती •➤ पान २ वर

# गॅरेजला भीषण आग



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील आकुर्ली या ठिकाणी असलेल्या एका गॅरेजला रविवारी अचानकपणे लागलेल्या आगीत मोठ्या प्रमाणात वाहनांचे नुकसान झाले आहे.

पनवेल तालुक्यातील आकुर्ली साई सज्ज निवास बिल्डिंगजवळ असलेल्या एका गॅरेजला अचानकपणे आग लागल्याने तेथे असलेल्या विविध प्रकारच्या वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीची माहिती मिळताच त्वरित नागरिकांनी अग्निशमन दलासह स्थानिक पोलिसांना कळवले. तात्काळ पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होऊन आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप कळले नाही. मात्र, गॅरेजचे मोठे नुकसान झाले असल्याची माहिती मिळाली आहे.

**डागडुजीनंतरच पर्यटनासाठी होणार खुला | पुरातत्त्व विभागाची माहिती**

# जंजिरा किल्ल्याचे दरवाजे अद्याप बंदच

**। मुरूड । प्रतिनिधी ।**

कोकणातील ऐतिहासिक आणि जलदुर्गांमधील सर्वाधिक प्रसिद्ध असलेला जंजिरा किल्ला पावसाळ्यात सुरक्षेच्या कारणास्तव पर्यटकांसाठी बंद करण्यात येतो. दरम्यानच्या काळात किल्ल्यामध्ये झाडेझुडपे वाढतात. त्यामुळे डागडुजी केल्यानंतर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यात येतो. मात्र, यंदा खराब हवामान तसेच अद्यापही डागडुजीचे काम पूर्णत्वास आले नसल्याने किल्ल्याचे दरवाजे पर्यटकांसाठी उघडण्यास काहीसा उशीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यामुळे पर्यटनाला मोठा फटका बसण्याची शक्यता असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

> **किल्ल्याच्या साफसफाई आणि डागडुजीसाठी किमान १० ते १५ दिवस लागतील. २० सप्टेंबरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.**
> **– बी.जी. येलीकर, सहाय्यक संवर्धक, पुरातत्त्व विभाग**

### व्यवसायाला फटका

**जंजिरा किल्ला बंद राहिल्याने पर्यटन व्यवसायाला मोठा फटका बसत आहे. पुरातत्त्व विभागाने स्वच्छता मोहीम वेगाने राबवून सप्टेंबर हंगाम वाचवण्याची गरज आहे, अन्यथा स्थानिक अर्थचक्रावर मोठा परिणाम होईल, असे बोलले जात आहे.**

सामान्यतः नारळी पौर्णिमेनंतर आणि सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला केला जातो. मात्र, यंदा अतिवृष्टी आणि उधाणामुळे किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळील काही भाग खचला आहे. तसेच २२ एकरांच्या विस्तीर्ण परिसरात झाडेझुडपे आणि बोरीच्या काट्यांचा प्रचंड साठा झाल्याने साफसफाईची गरज आहे. पुरातत्त्व विभागाच्या नियमानुसार, किल्ला उघडण्यापूर्वी डागडुजी व संपूर्ण परिसराची स्वच्छता करणे बंधनकारक असते. या कामासाठी मजुरांची उपलब्धता आणि निधीची आवश्यकता भासते.

पुरातत्त्व विभागाने दिलेल्या माहितीनुसार, साफसफाईसाठी किमान १० ते १५ दिवस लागतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही राजपुरी प्रवासी वाहतूक सोसायटीकडून •➤ पान २ वर



# कश्मीरमध्ये ढगफुटीने हाहाकार



**१७ जणांचा मृत्यू; ३२ भाविक बेपत्ता**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जम्मू-कश्मीरच्या रियासी आणि रामबन येथे ढगफुटी आणि भूस्खलनामुळे अक्षरशः हाहाकार उडाला आहे. दगड, माती आणि चिखलाच्या लोंढ्याखाली अनेकजण दबले असण्याची शक्यता असून, अनेक घरे, दुकानांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत १७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३२ जण बेपत्ता झाले आहेत.

१४ ऑगस्टपासून या भागात सातत्याने ढगफुटी आणि भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यात रियासीमध्ये १२ जणांचा, तर रामबन येथे ५ जणांचा मृत्यू झाला. दुसरीकडे वैष्णोदेवी यात्रा मुसळधार पाऊस आणि भूस्खलनाच्या घटनांमुळे रविवारी पाचव्या दिवशीही स्थगित करण्यात आली. आतापर्यंत ३४ भाविकांचा मृत्यू झाला असून, कटरा ते वैष्णोदेवीपर्यंतच्या १२ किलोमीटरचा मार्ग पूर्णपणे उखडला गेला आहे. •➤ पान २ वर

# उद्यापासून कडक उपोषण : जरांगे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

उद्यापासून मी पाणीसुद्धा पिणार नाही, अशी घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. तसेच मराठा आंदोलकांनी शांत राहावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

आझाद मैदानात जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरु केले आहे. रविवारी आंदोलकांशी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, मी उद्यापासून पाणीसुद्धा पिणार नाही. सरकार मागण्या मान्य करत नाही, हे सरकारच्या लक्षात येत नाही, त्यामुळे उद्यापासून मी पाणीसुद्धा बंद करणार आणि कडक उपोषण सरु करणार. तसेच मराठा आंदोलकांनी कुणावरही दगडफेक करून नये, मराठा समाजाच्या एकाही पोराने •➤ पान २ वर

# जेएसडब्ल्यूच्या अनधिकृत बांधकामाची पाहणी करा

■ जिल्हाधिकाऱ्यांनी प्रांत, कांदळवन सरंक्षक विभागाला दिले आदेश

■ तक्रारदार संजय सावंत यांचीही पाहणी दौऱ्यात समावेशाची सूचना

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

**जुई बापूजी येथील सरकारी स.नं. ५०/ड या राखीव वन जमिनीवर जेएसडब्ल्यूच्या अनधिकृत बांधकामांबाबत तक्रारदार संजय गंगाराम सावंत यांनी केलेल्या तक्रारीबबात सावंत यांच्यासह स्थळ पाहणी करून सर्व अहवाल सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन विभाग, दक्षिण कोकण, अलिबाग यांच्याकडे सादर करावेत, असे आदेश जिल्हाधिकारी रायगड यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आल्याची माहिती सावंत यांनी दिली आहे.**

अर्जाच्या अनुषंगाने, संबंधित शासकीय विभागांनी तक्रार स्थळाची संयुक्त पाहणी, वस्तुस्थिती पंचनामा, जागेचे अक्षांश-रेखांश व जीओ टॅगींग छायाचित्रासह पूर्तता अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे सर्व अहवाल सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन विभाग यांच्याकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अलिबाग तालुक्यातील जुई बापूजी येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे असलेली सरकारी स.नं. ५०/ड या राखीव वन जमीन सरकार जमा झाल्यावर आता या जमिनीवरील कंपनीच्या अतिक्रमण करून केलेल्या बांधकामांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही सुरू झाली आहे. या जागेवर जेएसडब्ल्यू स्टील या कंपनीने २००९ पासून कांदळवनांचे क्षेत्र नष्ट करून भराव करून प्रकल्पाच्या विस्ताराकरिता वनेत्तर कामे विनापरवाना केली असल्याचा अहवाल उपवनसंरक्षक अलिबाग यांनी दि. १३ नोव्हेंबर २०१९ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांना सादर केला आहे. याच कांदळवन जमिनीवर कंपनीने मातीचा भराव २८ जानेवारी २०१० पूर्वी केला आहे, तर संरक्षक भिंत ६ नोव्हेंबर, २०११ रोजी बांधली आहे, तसेच कनव्हेअर बेल्टसाठी सिमेंट कॉंक्रिटच्या फाऊंडेशनचे काम १ ऑक्टोबर, २०१७ ते ४ एप्रिल, २०१८ या कालावधीत पूर्ण केले आहे. कंपनीने अशी वनेत्तर कामे केली असल्याचा स्पष्ट अहवालाच उपवनसंरक्षक विभागाने जिल्हाधिकारी यांना १५ सप्टेंबर २०१८ आणि १३ नोव्हेंबर २०१९ रोजी दिला आहे. या अहवालामध्ये ही बेकायदा कांदळवन तोड जेएसडब्ल्यू कंपनीने केली असल्याचे अधोरेखित झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. गवई, न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह व के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने राखीव वनजमिनींबाबत दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालाप्रमाणे महसूल विभागाच्या ताब्यात वनीकरणासाठी आरक्षित असलेली जमीन एखाद्या खासगी व्यक्तीला किंवा संस्थांना वनीकरणाव्यतिरिक्त अन्य कोणत्या कारणांसाठी देण्यात आली आहे, हे तपासण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करावी, अशा जमिनींचा ताबा घेण्यासाठी पावले उचलून त्या वनविभागाकडे सुपूर्द कराव्यात, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. अशा जमिनी ताब्यात घेणे सार्वजनिक हिताचे ठरणार नाही. असे प्रकार आढळल्यास राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांनी त्या जमिनीची किंमत संबंधित जमीनधारक व्यक्ती अथवा संस्थेकडून वसूल करावी आणि ती रक्कम वन विकासासाठी वापरावी, असेही न्यायालयाने निकालात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे अलिबाग तालुक्यातील जुई बापूजी येथील सरकारी कांदळवनयुक्त जमिनीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कंपनीने राखीव वन जमिनीवर केलेल्या अतिक्रमणे तपासण्यासाठी व दूर करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करावी, अशा जमिनींचा ताबा घेण्यासाठी पावले उचलून त्या वनविभागाकडे सुपूर्द कराव्यात. याबाबत त्वरित कार्यवाही करून वन खात्याच्या राखीव वन जमिनीचे संरक्षण करावे, अशी मागणी सावंत यांनी केली होती.



# माता रमाबाई आंबेडकर उद्यानाचे लोकार्पण

## ८५ वृक्षांची लागवड

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड यांच्या पुढाकाराने डिकसळ येथे उद्यानाचे लोकार्पण तसेच विविध प्रकारच्या झाडांच्या लागवड करण्यात आली. आपल्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या लहान मुलांच्या स्मशानभूमीच्या जागेवर ५० झाडांची लागवड तसेच एका सात गुंठे जमिनीवर उद्यान विकसित करून जनतेला खुले करण्यात आले.

रायगड भूषण किशोर गायकवाड यांच्या माध्यमातून डिकसळ येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तेथील लहान मुलांच्या स्मशानभूमीची जमीन ही किशोर गायकवाड यांच्या मालकीची आहे. त्या १३ गुंठे जमिनीवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होऊ नये यासाठी झाडे लावण्यात आली. यावेळी आरपीआय आठवले पक्षाचे कोकण प्रदेश कार्याध्यक्ष राहुल डाळींबकर,कोकण संघटक मारुती गायकवाड, तालुका अध्यक्ष मनोज गायकवाड,कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष शिवाजी कराळे, पोलीस मित्र संघटनेचे प्रदेश अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, पोलीस पाटील सरिता शेळके, माजी उपसरपंच भारती पाटील आदी उपस्थित होते. त्यानंतर पोद्दार कॉलनी रस्त्याच्या बाजूला असलेल्या सात गुंठे जमिनीवर किशोर गायकवाड यांच्या माध्यमातून माता रमाबाई आंबेडकर उद्यान विकसित करण्यात आले आहे. या उद्यानाचे लोकार्पण राहुल डाळिंबकर आणि संतोष पेरणे यांचे हस्ते झाले. त्यावेळी अन्य मान्यवर तसेच कर्जत प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष भूषण प्रधान, सल्लागार दिगंबर चंदने आदी मान्यवर उपस्थित होते. या दोन्ही कार्यक्रमाचे नियोजन ॲड. उत्तम गायकवाड, अशोक गायकवाड, प्रणव गायकवाड, विजय पवार आदींनी केले होते.

# चलचित्रांची परंपरा जपणारे बबन सुर्वे

। कोर्लई । प्रतिनिधी ।





गौरी गणपती सणात आपल्या उपजत कलेला जोपासत वयाच्या ८५ व्या वर्षी सुमारे सहा फूट उंचीचे पर्यावरणपूरक शाडूच्या मातीचे मूर्तीचे चलचित्र स्वतः हाती काढून ५० वर्षांची परंपरा जपणारे बबन सुर्वे उर्फ फुटाणकर.

मुळात, ते भंडारी समाजातील सुर्वे कुटुंबात जन्मलेले; परंतु बबन फुटाणकर या नावाने सर्व पंचक्रोशीत प्रचलित आहेत. बालपणी मुरुडमध्ये भट्टीत भाजलेल्या चणे फुटण्याचे एकमेव दुकान होते. त्यावरुन मुरुड पंचक्रोशीत फुटाणकर नावाने ओळखले जाऊ लागले.

गणेशोत्सवात सुमारे पन्नास वर्षे शाडूच्या मातीची पर्यावरणपूरक सहा फूट उंचीच्या विविध मूर्ती तयार करून दरवर्षी बोधपर सांस्कृतिक तसेच अध्यात्मिक वेगवेगळी चलचित्रे उभारून भाविकांमध्ये आपली एक वेगळी छाप उमटविल्याचे येथील पंचक्रोशीमध्ये बोलले जाते. आपली कला जोपासत असताना त्यांनी अनेक कलाकारसुद्धा घडविले आणि ते आज व्यवसायात यशस्वी भरारी घेत आहेत. वयाच्या ८५ व्या वर्षीसुद्धा स्वतःची सत्तर वर्षांपूर्वीची बुलेट मोटारसायकल आजही चालवून शरीराने तंदुरुस्त आणि मनाने तरुण असल्याचे सिद्ध करतात.

## मराठा बांधवांसाठी शेकापची हाक

**पनवेल :** आझाद मैदानात लाखोंच्या संख्येने मराठा बांधव आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत आहेत. त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी अनेक सामाजिक संस्था, नागरिक पुढे सरसवाले आहेत. शेकापक्षानेदेखील अन्नदाता शेतकरी बांधव उपाशी राहू नये यासाठी कामोठे तसेच पनवेल परिसरातील नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे. माजी आ. बाळाराम पाटील यांच्या सूचनेनुसार आझाद मैदानातील अन्नदाता शेतकरी उपाशी राहू नये यासाठी हा जिन्नस जमा करत आहोत, अशी माहिती अमोल शितोळे यांनी दिली.

# कर्जतमध्ये ३८५० गौराई विराजमान

। नेरळ । प्रतिनिधी ।



गणेशोत्सव सण मोठ्या उत्साहात सुरू असून, आता सर्व गणेशभक्तांना आतुरता असलेल्या गौराईचे आगमन रविवारी झाले. कर्जत तालुक्यात आज तब्बल ३८५० गौराईचे आगमन झाले असून, उद्या सोमवारी गौराई मखरात विराजमान होणार आहेत.

अनेक ठिकाणच्या गणेश कला मंदिर येथे महिला आणि तरुणी या गौराईला आणण्यासाठी एकत्र जमल्या असल्याचे चित्र दिसत होते. कर्जत तालुक्यात तब्बल ३८५० घरी गौराईचे आगमन झाले. कर्जत पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गावांमध्ये १३४६ घरी गौराई विराजमान होणार आहेत, तर नेरळ पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गावांमध्ये १२५२ भक्तांच्या घरी गौराई विराजमान होणार आहेत. दीड दिवसांसाठी आगमन होत असलेल्या गौराईच्या स्वागतासाठी भक्त आतुर झाले असून सर्वत्र गणेशोत्सवाचा फिव्हर दिसून येत आहे.

**हळदीच्या फुलांच्या गौराईला विशेष महत्व**

शाडू किंवा प्लास्टर ऑफ पॅरिस यांच्या मूर्ती मागील काही वर्षी मिळायला लागल्या आहेत.मात्र त्या पूर्वी जंगलातून हळदीची गुलाबी फुले आणि अन्य प्रकारची झाडांची पाने यांची गौराई बनवली जायची.

त्यावेळी घरातील महिला वर्ग त्या फुलांची एक जुडी बनवून त्यावर साडी चोळी चढवून विविध प्रकारचे दागिने परिधान करून गौरी देवीची सजावट करायचे. सध्या अशाप्रकारची गौराई आणि त्या गौराईसमोर पिठापासून बनवलेले दिवे अशी सजावट राहिली नाही. पण नव्याने बनवलेल्या गौराई या विविध प्रकारच्या कपड्यांनी सजूनच गणेश कलाकेंद्रातून बाहेर निघत असतात. त्यामुळे गौराईची विविध रूपे पाहण्यासाठी भक्त आतुर आहेत असेच चित्र सगळीकडे दिसून येत आहे.

# भोईरवाडीत रक्तदान शिबिराचे आयोजन

। तळा । प्रतिनिधी ।

तळा शहरातील भोईरवाडी येथे ग्रामस्थ, मुंबईकर, महिला मंडळ व हौशी बाल मित्रमंडळ भोईरवाडी यांच्याकडून गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणावर शहरातील नागरिक आपल्या गावी येत असतात व गणेशोत्सव साजरा करून पुन्हा आपल्या कामावर शहराकडे परततात. मात्र, यावर्षी काहीतरी समाजोपयोगी उपक्रम राबवावा, असा विचार ग्रामस्थांनी केला.

गणेशोत्सव हा केवळ सण म्हणून साजरा न करता त्याला सामाजिकतेशी जोडण्याच्या दृष्टीने तसेच राज्यात रक्ताचा असलेला तुटवडा लक्षात घेता जिल्हा रुग्णालय शासकीय रक्तदान केंद्र अलिबाग यांच्या विद्यमाने ग्रामस्थांकडून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात पन्नास बाटल्या रक्त संकलित करण्यात आल्या. भोईरवाडी गावाने गणेशोत्सवात राबविलेला रक्तदान शिबिराचा उपक्रम अनेक गावांना प्रेरणा देणारा ठरला असून, त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# खैरवाडीजवळ कंटेनरला अपघात, चालक गंभीर जखमी

। सुकेळी । प्रतिनिधी ।



मागील दोन ते तीन महिन्यांपासून महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघातात वाढ झाल्याचे चित्र दिसत असतानाच सुकेळी खिंडीजवळ खैरवाडी गावाच्या समोर अत्यंत धोकादायक वळणावरती रविवारी पुन्हा एकदा भीषण अपघात झाला.

तीन ते चार महिन्यांपासून जवळपास १५ ते २० अपघात झालेल्या ठिकाणीच ऐन गणेशोत्सवाच्याच दिवसात रविवार दि. ३१ ऑगस्ट दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास कंटेनरला अपघात होऊन कंटेनर रस्त्याच्या मधोमध पलटी झाला. यामध्ये चालक गंभीररित्या जखमी झाला. सुदैवाने ज्या ठिकाणी कंटेनर पलटी झाला, त्या ठिकाणाहून कोणतेही दुसरे वाहन जात नसल्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

याबाबतीत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरुन महाड बाजूकडून पनवेलच्या दिशेने रसायन घेऊन जाणारा कंटेनर क्र. एम.एच. ४८ ए.जी. ८०७० चालक घनशाम चंद्रप्रकाश तिवारी (२९) रा. लखनऊ, उत्तर प्रदेश याचे आपल्या गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे गाडी सरळ दुभाजकावर धडकली.

त्यामुळे रसायनने भरलेला कंटेनर रस्त्याच्या मध्यभागी पलटी झाला. या अपघाताची माहिती मिळताच नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी आपल्या कर्मचाऱ्यांसह तसेच वाकण टॅबचे सर्व कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन क्रेनच्या सहाय्याने कंटेनर बाजूला करुन वाहतूक सुरळीत सुरु करण्यात आली.

# तालुका प्रमुखपदी मिलिंद खारपाटील

। उरण । प्रतिनिधी ।



आवाज महामुंबईचा चॅनेलचे संपादक तथा पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्रचे रायगड जिल्हाध्यक्ष मिलिंद खारपाटील यांची आगरी सेना पत्रकार संघ उरण तालुका प्रमुखपदी नियुक्ती आगरी सेना रायगड जिल्हा प्रमुख सचिन मते यांनी जाहीर केली.

मिलिंद खारपाटील हे गेली ३६ वर्ष अनेक वर्तमानपत्र आणि न्यूज चॅनेलमध्ये सक्रिय काम करीत आहेत. श्रमजीवी मध्ये सहसंपादक, श्रमशक्ती मध्ये कार्यकारी संपादक, महामुंबई २४ बाय ७ मध्ये संपादक म्हणून त्यांनी काम केले आहे. रामप्रहर, कर्नाळा, किल्ले रायगड, आपले साम्राज्य, आवाज कोकणचा, पुण्यनगरी, कृषीवल, उरण टाईम्स आदी वृत्तपत्रांमध्ये त्यांनी काम केले आहे. सध्या ते आवाज महामुंबईचा चॅनेलमध्ये संपादक असून, पत्रकार उत्कर्ष समिती रायगडचे ते जिल्हाध्यक्ष आहेत.

पान १ वरुन

## नागोठणे पोलिसांना गुंडांचा लळा?

पोलीस ठाण्यात येण्यासाठी पोलीस अधिकारी नेहमीच इच्छुक असतात. त्यामुळे यापूर्वी येथून काम करून गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या कामातून एक वेगळीच छाप पडली आहे. असे असतानाच मात्र सध्या याच शांतताप्रिय पोलीस ठाण्यात पूर्वी एका मोठ्या गुन्ह्यात सहआरोपी असलेल्या तसेच अनेक छोट्या-मोठ्या गुन्ह्यात पोलीस ठाण्यात केसेस असलेल्या एका गुंडाची ऊठबस वाढली आहे. काही पोलिसांना या गुंडाचा लागलेला लळा नेमका कशासाठी आहे? असा प्रश्न सर्वसामान्य सुज्ञ नागोठणेकरांना पडला आहे. याच गुंडाचा वाढदिवस काही दिवसांपूर्वी या लळा लागलेल्या पोलिसाने आपल्या चेंबरमध्ये केक कापून साजरा केल्याची चर्चा नागोठण्यात रंगली होती. दरम्यान, या सर्व प्रकाराची येथील प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांना खरोखर माहिती नाही का? आणि माहिती असेल तर या पोलिसांना प्रभारी अधिकारी का पाठीशी घालत आहेत? असा प्रश्नही आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.

नागोठणे पोलीस ठाण्याचा चांगला इतिहास असतानाच आत्ताच येथील काही पोलिसांना विविध गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेल्या या गुंड व्यक्तीचे सहकार्य का लागावे? यामागे नक्की कोणते अर्थकारण आहे, असा प्रश्न सर्वसामान्य नागोठणेकरांना पडला आहे. याआधी गावात कसेही फिरणाऱ्या या गुंड व्यक्तीचा नागोठणे पोलीस ठाण्यात सध्या शर्ट इन करून सहजपणे वावर होताना दिसत आहे. कोणताही प्रकार, घटना, गुन्हा घडला की ही व्यक्ती पोलिसांच्या दिमतीला हजर होत आहे. त्यामुळे या व्यक्तीची मदत घेण्याइतपत नक्की नागोठणे पोलीस ठाण्यातील आम्ही कर्मचारी कमकुवत आहोत का? असा प्रश्नही इतर कर्मचाऱ्यांना पडत आहे, अशी चर्चा आहे.

अधिकाऱ्यांचे जाणीपूर्वक दुर्लक्ष

सध्या नागोठणे पोलीस ठाण्यातील बिन गणवेशधारी दोन हे.कॉ. पोलिसांसोबत भरनाक्यावर, बाजारपेठ, खुमाचा नाका व इतर परिसरात आपणही पोलीस असल्याच्या तोऱ्यात फिरताना ही शर्ट इनधारी गुंड व्यक्ती दिसत आहे. नागोठणे पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांना आपल्या पोलीस ठाण्यात सुरू असलेले हे विविध प्रकार दिसत नाहीत का? की याकडे ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, असा प्रश्नही नागरिकांतून उपस्थित करण्यात येत आहे.

गुंडांना पाठीशी घालण्याचा प्रकार

नागोठणे पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे २७ डिसेंबर, २०२३ रोजी उद्घाटन करताना जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत यांनी जिल्ह्यातील गुंडगिरी नष्ट करण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना केले होते. असे असताना नागोठणे पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी गुंडांनाच पाठीशी घालत असल्याचे दिसून येत आहे. असेच एक दुसरे उदाहरण म्हणजे, येथील रिलायन्स कंपनीच्या एका नवीन प्रकल्पात बाहेरील ठेकेदारांना पैशांसाठी धमकवणाऱ्या त्या भागातील एका गुंडालाही त्याच्याविरोधात अनेक तक्रारी असूनही पाठीशी घालण्याचा प्रकार होत आहे. याचा अनुभव येथील पत्रकारांनाही आला आहे. या गुंडाची मद्यप्राशन करून प्रभारी अधिकाऱ्याच्या केबिनमधील झालेली थेट एन्ट्री अधिकाऱ्याच्या केबिनमध्ये जाण्यासाठी वाट पाहात बसलेल्या येथील स्थानिक पत्रकारांनीही अनुभवली आहे. त्यामुळे हे गुंड नक्की पोलिसांना नक्की कशासाठी लागतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## सुधागडातील शेतकऱ्यांची फसवणूक

पांडुरंग लिंबाजी तेलंगे यांनी उच्च न्यायालय मुंबई येथे फौजदारी रीट याचिका क्र. १९५/२०२२ दाखल केली होती. न्यायालयाने फिर्यादी तेलंगे यांना प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालय, पाली-सुधागड येथे तक्रार करण्यास सूचित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३७/२०२४ दाखल केला होता. याप्रकरणी सुनावणी होऊन पांडुरंग लिंबाजी तेलंगे यांचे मुंबई उच्च न्यायालयातील वकील ॲड. आर.एन. कच्छवे यांनी बाजू मांडली असता न्यायालयाने याप्रकरणी उपरोक्त आरोपींविरूध्द गुरुवारी (दि. १४) पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकांना गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच न्यायालयासमक्ष सदर तपासासंबंधी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, पांडुरंग लिंबाजी तेलंगे यांनी त्यांची पत्नी कल्पना लिंबाजी तेलंगे यांचे नावे अप्पर जिल्हा अधिकारी रायगड, अलिबाग येथे अपील दाखल असताना त्यांच्यावतीने ते चालविण्यासाठी दि. ०९/०३/२०१२ रोजी अशोक श्रीपत भारती यास पत्नी कल्पना पांडुरंग तेलंगे, मधुकर राजाराम खंडागळे, दोघे रा. वऱ्हाड, जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड, महादेव सखाराम देशमुख, बाळू विठ्ठल देशमुख, काळुराम हरी पुरी, तिघेही रा. हेदवली, पो. जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड व पांडुरंग बाळू दळवी, रा. कानसळ, ता. सुधागड, जि. रायगड या सर्वांनी अशोक श्रीपत भारती यास कुळमुखत्यारी म्हणून नेमणूक केली व हेदवली येथील गट नं. २१९, २२८ व २२९ तसेच कानसळ येथील गट नं. ७८, ७९/१ अ, ८०, ५९/१, ५४ या जमिनी पूर्वी उपरोक्त शेतकऱ्यांच्या मालकीच्या होत्या. त्या जमिनी परत मिळणेकामी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे अर्ज केला होता. त्या कारणाकरिता या जमिनीसंदर्भात शेतकऱ्यांच्या वतीने विविध कामांकरीता मुखत्यारनामा सह्या करून नोटरी करून दिला होता.

सदर कुलमुखत्यार नामाचा गैरफायदा घेऊन पांडुरंग लिंबाजी तेलंगे व इतर शेतकऱ्यांना कसलीही माहिती न देता परस्पर मेसर्स शमरॉक एंटरप्रायजेसचे मालक कल्पेश खोखानी यांच्याविरूद्ध असलेला दावा परस्पर शेतकऱ्यांच्या वतीने सह्या करून तसेच कोऱ्या कागदावर सह्या घेऊन परस्पर ते दावे मेसर्स शमरॉक एंटरप्रायजेसचे मालक कल्पेश खोखानी व त्यांचे सहकारी उचलून घेऊन गैरमार्गाने फिर्यादी तेलंगे व इतर शेतकऱ्यांचे नुकसान केले आहे. याबाबत दि. ०४/०३/२०२० रोजी तेलंगे यांची पत्नी कल्पना पांडुरंग तेलंगे यांनी कल्पेश खोखानी व त्यांचे सहकारी तिचे असलेले अपिलाबद्दल काय चालले आहे ते कळविण्यासंबंधी पत्र लिहिले, पण त्याने कसलीच दखल न घेतल्याने तेलंगे यांच्या पत्नीने वकील शमीका शिवाजी दळवी यांच्यामार्फत आरोपीस नोटीस पाठविली व खुलासा मागितला. मात्र, त्याने त्याची कसलीच दखल घेतली नाही. शेवटी तेलंगे यांनी संबंधित रायगडचे अप्पर जिल्हा अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन माहिती काढली असता कल्पेश खोखानी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संगनमताने परस्पर तक्रारी मागे घेतल्याचे माहिती पडले व अप्पर जिल्हा अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात दि. १३/०७/२०१६ च्या तडजोड पुरसीसप्रमाणे सदर प्रकरण निकाली काढण्यात आल्याचे माहिती पडले. अशाप्रकारे अशोक श्रीपत भारती व कल्पेश रामेशचंद्रन खोखानी यांनी तेलंगे यांची पत्नी व इतर सहा जणांचा विश्वासघात व फसवणूक करून गैरमार्गाने अपरिमीत नुकसान केले आहे. कल्पेश खोखानी व त्यांचे सहकारी यांनी केलेल्या उपरोक्त गुन्ह्यांची न्यायालयाने दखल घेऊन पांडुरंग लिंबाजी तेलंगे यांना न्याय दिला आहे. याप्रकरणी त्यांनी हे प्रकरण लावून धरून तडीस नेल्याबद्दल त्यांचे वकील ॲड. आर.एन. कच्छवे यांचे विविध शेतकरी संघटना व नागरिकांच्यावतीने कौतुक केले जात आहे.

## आरोपी बापाचा बनाव

## चिमुकलीमुळे उघड

सांगण्यावरून याप्रकरणी अपमृत्यूची तक्रार दाखल केली होती.

मात्र, त्यानंतर आरोपीने आपल्या सात वर्षांच्या मुलीला घेऊन उलवे येथे पलायन केले होते. यामुळे पोलिसांची सुई पतीवर येऊन ठेपली. तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजची तपासणी केली. या फुटेजमध्ये पलायनाच्या तयारीत असलेला आरोपी मुलीसमावेत पागोटे येथे आल्याचे निदर्शनास येताच उरण पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. तपासातही आरोपीने पत्नीने स्वतःच जाळून घेत आत्महत्या केल्याचे सांगितले. मात्र, वडिलांनीच आईला रॉकेल ओतून पेटवून दिल्याची बाब सात वर्षांच्या मुलीने पोलिसांसमोर उघडकीस आणली. पोलिसांसमोरच मुलीने वडिलांचे कूकर्म उघडकीस आणल्यानंतर उरण पोलिसांनी लागलीच आरोपीला बेड्या ठोकल्या. न्यायालयाने आरोपीला सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल काठवाणी करीत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## आदिवासी कुटुंबाला मारहाण

प्राप्त होताच ताबडतोब मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन जखमींना प्रथम मुरुड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले.फिर्यादी मंगेश वाघमारे, वय ४२ वर्षे, रा. भालगाव, ता. रोहा यांनी पोलिसांना सविस्तर माहिती दिली. त्यानंतर दिपेश कृष्णा ठाकूर, विजय विठ्ठल पाटील, परेश कृष्णा ठाकूर, विराज विजय ठाकूर, करण विठोबा चिपकर, सुजय संतोष शहापूरकर, दिपेश दत्ताराम माळी, विनिते विजय ठाकूर, सागर पांडुरंग ठाकूर हे सर्व मिठागर, पो. सावली, ता. मुरुड येथील असून, त्यांच्याविरोधात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच अलिबागच्या उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण घटनेची माहिती घेतली. दरम्यान, सर्व ग्रामस्थांना शांतता राखण्याचे आवाहन केले. या घटनेचा पुढील तपास मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे करीत आहेत.

## उद्यापासून कडक उपोषण : जरांगे

दगडफेक करायची नाही, समाजाला मान खाली घालावी लागल असं एकही पाऊल कोणी उचलायचं नाही. सगळ्यांनी शांत राहायचं. त्यांना आपल्यावर कितीही अन्याय, अत्याचार करू द्या, मला तुमच्याकडून शांतता पाहिजे. मी तुम्हाला आरक्षण देणार, त्याशिवाय मुंबई सोडणार नाही. अन्नछत्र आणि रेनकोटच्या नावाने कुणी पैसे उकळत असेल तर तसे करू नका, काही लोकांनी लोकसभा निवडणुकीला तसे प्रकार केले होते. जर असे परत घडल्यास मी नावं जाहीर करीन, असेही जरांगे यावेळी म्हणाले.

## कश्मीरमध्ये ढगफुटीने हाहाकार

हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या. परिणामी, तब्बल ५५७ रस्ते बंद करण्यात आले आहेत. यात तीन राष्ट्रीय महामार्ग आणि मंडीतील सर्वाधिक २१३ रस्त्यांचा समावेश आहे, तर उत्तराखंडमध्ये बद्रिनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे.

## जंजिऱ्याचे दरवाजे अद्याप बंदच

मजूर व साहित्य ने-आण करण्यासाठी होड्यांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे; परंतु सध्या मजुरांची टंचाई भासत असल्याचे सांगण्यात येत आहे. कोकणात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मजूर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नसल्याने ही अडचण वाढली आहे. या विलंबामुळे पर्यटनपूरक व्यावसायिकांवर आर्थिक संकट ओढवले आहे. मुरूड-जंजिरा परिसरातील हॉटेल, लॉजिंग, समुद्री खेळ, तसेच शिडाच्या बोटी व इंजिन होड्यांवर अवलंबून असलेल्या सुमारे १५० ते २०० कुटुंबांची आर्थिक कोंडी त्यामुळे होणार आहे. प्रवासी वाहतूक थांबल्याने लाखोंचे नुकसान होत आहे. याशिवाय जून-जुलैनंतर पाऊस कमी झाल्यावर मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची जंजिरा किल्ला पाहण्यासाठी गर्दी होते. यामध्ये देश-विदेशातून पर्यटक येत असतात; मात्र किल्ला बंद असल्याने हा हंगाम व्यर्थ जात असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. पर्यटकांमध्ये जंजिरा आणि पद्मदुर्ग किल्ल्यांबाबत विशेष आकर्षण आहे. त्यामुळे किल्ला लवकरात लवकर खुला करण्याची मागणी स्थानिकांसह पर्यटकांकडून होत आहे.

# निवडक



## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब** : रोहा तालुक्यातील देवकान्हे येथे वाढदिवसाचा सोहळा गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून साजरा करण्यात आला. रूपेन तन्ना मेमोरियल ट्रस्ट मुंबई व कोकण कला शिक्षण व सामाजिक संस्था यांच्या विशेष सहयोगाने युवा समाजसेवक संदेश गायकवाड यांचा हा वाढदिवसाचा सोहळा तालुक्यातील धानकान्हे आदिवासी वाडी शाळा व प्राथमिक शाळा तळवली तर्फे अष्टमी येथील सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तळवली तर्फे अष्टमी येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी युवा समाजसेवक संदेश गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ जाधव, राज जाधव, आदित्य गायकवाड, मुख्याध्यापिका लिना खराडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा कस्तुरी बामणे, देविदास मरवडे, नितिन वायकर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या निवासस्थानी संपन्न झालेल्या वाढदिवसाच्या सोहळ्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने त्यांचे मित्र परिवार, नातेवाईक व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

## रिक्षाचालकावर गुन्हा दाखल

**पनवेल** : रिक्षाचालकाने एका तरुणीशी जवळीक साधण्याच्या उद्देशाने तिचा मोबाईल क्रमांक मागून मैत्री करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी या रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही तरुणी इंजिनीअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. परीक्षा असल्याने ती कॉलेजमध्ये गेली. त्यानंतर रिक्षात बसून खारघर येथे जाण्यास निघाली. या वेळी रिक्षाचालकाने तिच्याशी ओळख वाढवण्याचा प्रयत्न केला. या वेळी पैसे पाठवण्यासाठी स्कॅनर मागितला असता, स्कॅनर देण्यास रिक्षाचालक टाळत होता. त्यानंतर त्याने उद्या आपण जेवायला बाहेर जाऊ, असे बोलून त्या मुलीकडे नंबर मागितला, मात्र त्या मुलीने वडिलांचा मोबाईल नंबर दिला आणि ती मुलगी हॉस्टेलमध्ये निघून गेली. दरम्यान, तिने तिच्या वडिलांना ही घटना सांगितली. काही वेळाने त्या रिक्षाचालकाचा तिच्या वडिलांना फोन आला, मात्र त्यांनी तो उचलला नाही. ही बाब तिने हॉस्टेलमधील वॉर्डनला सांगितली. त्यानंतर या रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात तिने तक्रार दिली.

## विश्वकर्मा शेकापच्या सहचिटणीसपदी

**पनवेल** : बबन विश्वकर्मा यांची शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल महानगरपालिका जिल्हा सहचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, या सर्व विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे. नवीन पनवेल येथे राहणारे बबन विश्वकर्मा यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. तसेच गरजूंना मदत करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत शेकापने त्यांच्यावर जिल्हा सहचिटणीसपदाची जबाबदारी सोपवली आहे.



## डिलिव्हरी पार्सलची चोरी

**पनवेल** : मोटरसायकल आणि त्यावर ठेवलेल्या ४० डिलिव्हरी पार्सलची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात २४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अर्ष अहमद हा तळोजा फेस टू येथे राहत असून शॅडो फिक्स या कंपनीत पार्सल डिलिव्हरीचे काम करतो. मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ सी डब्ल्यू ५३८२ सुझुकी एक्सेस यावर तो पार्सल देण्यासाठी आसावरी सोसायटीत गेला होता. त्याने पार्किंग मध्ये गाडी पार्क केली आणि पार्सल देण्यासाठी बिल्डिंगमध्ये गेला. त्यानंतर मोटरसायकल पाहिली असता ७० हजारांची मोटरसायकल मिळून आली नाही आणि त्यावरील २० हजारांचे पार्सलदेखील चोरून नेले.

## कारच्या धडकेत चालक जखमी

**पनवेल** : चार चाकी कारने स्कुटीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात २६ वर्षीय रोहन बेहरा जखमी झाला. या अपघाताप्रकरणी २६ ऑगस्ट रोजी खारघर पोलीस ठाण्यात कारचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

रोहन बेहरा हा २५ ऑगस्ट रोजी स्कुटी क्रमांक एम एच ४६ सीटी ८०७३ घेऊन सेक्टर २०, मच्छी मार्केट येथे सामान आणण्यासाठी जात होता. यावेळी चारचाकी गाडीने त्याच्या स्कुटीला धडक दिली. यात तो खाली पडला आणि जखमी झाला.

## गणेशोत्सवात केळीच्या पानांना मागणी

**रायगड** : गणेशोत्सवाच्या निमित्ताने दुर्गम भागातील महिलांना केळीच्या पानांनी रोजगार मिळवून दिला आहे. गणेशोत्सवाच्या काळात गणपतीला नैवेद्यासाठी आणि जेवणावळीसाठी केळीच्या पानांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यामुळे यंदाही केळीच्या पानांची मागणी वाढली असून, ग्रामीण भागातील नागरिकांना यातून रोजगाराची संधी मिळते. गणेशोत्सवानंतर पितृपक्ष आणि त्यानंतर येणाऱ्या नवरात्रोत्सवातही या पानांना मोठी मागणी असते. त्यामुळे दोन महिने आदिवासी महिलांच्या रोजगाराचे महिने मानले जातात.



पूर्वापार सणासुदीच्या काळात केळीच्या पानांचा विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात वापर होतो. गणेशोत्सव सुरू झाल्यापासून केळीच्या पानांची मागणी वाढली आहे. ग्रामीण भागातील आदिवासी महिला जंगलात किंवा शेतांमध्ये जाऊन केळीची पाने गोळा करून त्यांची विक्री करतात. गोळा केलेल्या पानांचे भारे तयार केले जातात. एका भाऱ्यात साधारणपणे ४० ते ५० पाने असतात आणि त्याची विक्री ४०० ते ५०० रुपयांना केली जाते. गेल्या वर्षी हाच भारा ३०० ते ३५० रुपयांना विकला जात होता. पर्यावरणाला पूरककेळीचे पान हे पौष्टिक गुणधर्म असलेले पान म्हणून ओळखले जाते. त्यामुळे ते आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. केळीचे पान हे पर्यावरणपूरक असल्याने त्याचे विघटन होते.

## विरार-अलिबाग कॉरिडॉरला गती

# बीओटीला मंजुरी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**आर्थिक निधीअभावी रखडलेल्या विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉरच्या कामाला आता गती येणार आहे. कर्ज मिळवण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी येत असल्याने राज्य सरकारने आता हा प्रकल्प ईपीसीऐवजी बांधा-वापरा- हस्तांतरित करा या तत्त्वावर उभारण्यास मंजुरी दिली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने याआधी राबवलेली ईपीसी निविदा प्रक्रिया रद्द करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे कोणत्याही अतिरिक्त आर्थिक भराशिवाय एमएसआरडीसीला हा प्रकल्प पूर्ण करणे शक्य होणार आहे.**



मुंबईसह एमएमआर क्षेत्रातील वाहतुकीला चालना मिळावी, म्हणून एमएसआरडीसीने विरार-अलिबाग मल्टिकॉरिडॉर उभारण्याचे नियोजन केले आहे. १२६.३ किलोमीटर लांबीचा हा मार्ग वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण व अलिबाग या तालुक्यातून जाणार आहे; मात्र दहा वर्षांपासून हा प्रकल्प कागदावरच आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारने या प्रकल्पासाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जाला हमी दिलेली असतानाही कर्ज मिळवताना एमएसआरडीसीसमोर अनेक तांत्रिक अडचणी होत्या. त्यामुळे हा प्रकल्प ईपीसी तत्त्वावर करण्यासाठी काढलेल्या निविदा रद्द केल्या आहेत. तसेच बीओटी तत्त्वावर प्रकल्प करण्यास मंजुरी दिली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात पालघर जिल्ह्यातील नवघर ते पेण तालुक्यातील बलावली हा ९६ किलोमीटरचा मल्टिकॉरिडॉर उभारण्यास हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे हा प्रकल्प आता मार्गी लागणार असल्याचे निश्चित झाले आहे. भूसंपादनासाठी मान्यता राज्य सरकाराने मल्टिकॉरिडॉरची भूसंपादनाची कार्यवाही तत्काळ हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी २२,२५० कोटी रुपयांच्या रकमेस आणि त्यावरील संभाव्य व्याजालाही मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाकरिता प्रशासकीय मान्यता, वित्तीय नियोजन व वित्तीय आराखडा, प्रारूप निविदा प्रपत्रे, सवलत करारनाम्याचा मसुदा महामंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर सरकारच्या मंजुरीने नियमित पद्धतीप्रमाणे निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे.

### हे महत्त्वाचे मार्ग जोडले जाणार

- जे.एन.पी.टी.
- प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ
- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (अटल सेतू)
- मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८
- मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८४८
- कल्याण- मुरबाड- निर्मळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१
- तळोजा बायपास
- मुंबई-वडोदरा एक्स्प्रेस वे
- मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे
- मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग ४८
- पनवेल-उरण राष्ट्रीय महामार्ग क्र. ४
- मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६

## मराठा बांधवांना मदतीचा हात

**पनवेल** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आदेश दिला आणि त्वरीत शिवसेना पनवेल शहर शाखे कडून मराठा आरक्षण मोर्चासाठी बांधवांना मदतीचा हात देण्यात आला.

शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाचे प्रभाग २० चे पदाधिकारी आणि शिवसैनिक मराठा मोर्चासाठी आलेल्या बांधवासाठी नाश्ता आणि जेवण घेऊन पनवेल रेल्वे स्टेशन व परिसरात पोहचले त्यांनी शहर प्रमुख प्रविण जाधव, विभाग प्रमुख अमोल गोवारी, उपविभाग प्रमुख वैभव मढवी, भिंगारी शाखा प्रमुख प्रविण डावलेकर, काळुंद्रे शाखा प्रमुख तुळशीराम चिखलेकर, भिंगारी उपशाखा प्रमुख सुधीर मिसाळ, गटप्रमुख रणजित परदेशी, सर्वेश पवार, मोहन भोसले, राजू पनवेलकर, राजु शिंदे आदींनी मराठा बांधवांना मदतीचा हात देत जेवण व वस्तूंचे वाटप केले.

## गणपती बाप्पांचे विसर्जन खड्ड्यांतूनच

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड परेश नाका ते समुद्र लाईन ते मच्छिमार्केट ते एकदरा पुलापर्यंतचा रस्त्याला खड्डेच खड्डे पडल्याने या संदर्भात वृत्तपत्रात बातम्या येऊ लागल्याने मुरुड सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्यावरचे खड्डे बुजविला सुरुवात केली. परंतु भरलेले खड्डे काही दिवसातचं पुन्हा उखरल्याने रस्तावर पुन्हा खड्डेच खड्डे दिसुन लागले आहेत.यामुळे यंदा ही गणपती बाप्पांचे विसर्जन खड्ड्यातुन करावं लागणार का असा प्रश्न विचारला जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने पावासाचं मूहर्त पाहुन रस्त्यावरचे खड्डे बुजविण्यास सुरुवात केली. परंतु खड्डे बुजविताना चांगली डांबर खड्डी मिक्स करून भुसा टाकला असतातर ही खड्डी पावासाच्या सरीत वाहुन गेली नसती. परंतु दे ढकल काम केल्याने पुन्हा जैसे थे रस्त्यावर खड्डेच खड्डे दिसुन आले. पुन्हा याच रस्त्यावरून नागरिकांना व वाहन चालकांना खड्ड्यातुन प्रवास करावा लागत आहे.गणपती बाप्पाचं विसर्जन दोन दिवस बाकी आहेत. पुन्हा पडलेले रस्त्यावरचे खड्डे कधी बुजवणार? हा रस्ता नवीन बनविण्यासाठी सरकारने लाखो रूपयांचा निधी मंजूर केला परंतु ही निधी दोन वर्ष पडुन आहे. दोन वर्षे झाली तरी ही हा रस्ता नव्याने बनवत नाही.



फक्त डागडुजी करायची आणि शासनाचा पैसा वाया घालावाचा. सार्वजनिक बांधकाम विभागाला कधी जाग येणार असा प्रश्न विचारला जात आहे. मुरूड पर्यटन क्षेत्र असुन रोज शेकडो पर्यटक या खड्डेमय रस्त्यावरून ये-जा करित असतात. यामुळे पर्यटकांच्या संख्येत घट होऊ लागली आहे. यामुळे स्थानिक व्यावसायिक चिंतेत आहेत.

## एटीएममधून कार्डची अदलाबदली करून केली फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

एटीएम कार्डाची अदलाबदली करून त्याद्वारे ५३ हजार रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उषा राजभर या खिडूकपाडा येथे राहत असून त्या त्यांच्या आईचे एटीएम कार्ड घेऊन डी मार्टच्या बाजूला कळंबोली येथे पैसे काढण्यासाठी गेले. पैसे काढत असताना एक इसम आतमध्ये आला आणि मला पैसे काढायचे आहेत तुम्ही लवकर पैसे काढा असे बोलला.

यावेळी त्याने राजभर यांचा एटीएम पिन पाहिला. पैसे काढत असताना त्या इसमाने कार्ड काढून त्यांच्याकडे दिले. या वेळी त्या व्यक्तीने त्याच्याकडील एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकून काहीतरी चेक करून तो निघून गेला. त्यानंतर त्यांच्या वडिलांच्या मोबाईल मध्ये ५३ हजार रुपये वेगवेगळे एटीएममधून पैसे काढण्याचे मेसेज आले. यावेळी त्या इसमाने हातचलाखीने एटीएम चेंज करून दुसरे एटीएम कार्ड दिल्याचे त्यांच्या लक्षात आले.

## लॅपटॉप चोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

रियल इस्टेटचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाच्या कार्यालयातून लॅपटॉप आणि ५० हजार रुपये रोख चोरीला गेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रकांत भोसले हे खारघर सेक्टर १२ येथे राहतात. त्यांचा खारघार सेक्टर २० येथे रिअल इस्टेटचा व्यवसाय आहे. ऑगस्ट महिन्यात त्यांना प्रसाद परब याने कॉल करून कल्याणी कावसकर हिचे भाड्याने घेतलेले दुकान रिकामे करण्याची धमकी देत त्यांनी कार्यालयात येण्यास सांगितले. त्यावर भोसले कार्यालयात गेले असता तेथे जमलेल्या माणसांनी त्यांना हे दुकान ताबडतोब रिकामे करून द्यावे लागेल, अशा प्रकारे धमकवण्यात आले, मात्र त्यांनी नकार दिल्याने मारण्याची धमकी देत दुकान फोडून टाकू, असे सांगण्यात आले. त्यानंतर भोसले तेथून निघून गेले. मात्र, भोसले दुकानाकडे गेले असता, दुकानाचा बॅनर फाटलेला तसेच दुकानाला लावलेले कुलूप जागेवर नसल्याचे आढळले.

## रोह्यात श्लोक पाठांतर स्पर्धेला प्रतिसाद

**। रोहा । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा तर्फे दरवर्षी प्रमाणे विविध सांस्कृतिक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये चित्रकला, बुद्धिबळ आणि श्लोक पाठांतर स्पर्धा या तीन प्रमुख स्पर्धा उत्साहात पार पडल्या.



चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला आणि रंगांना सुंदर अभिव्यक्ती दिली. विषयानुसार साकारलेली चित्रे पाहून उपस्थित प्रेक्षक आणि परीक्षक प्रभावित झाले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून भक्ती देशमुख यांनी आपली भूमिका बजावली.

बुद्धिबळ स्पर्धेत अनेक तरुणांनी आपल्या बुद्धिमत्तेची कसोटी लावली. खेळाडूंनी संयम, विचारशक्ती आणि डावपेचांचा उत्तम मेळ घालून खेळ खेळला. या स्पर्धेचे परीक्षण कार्य हर्षद भाटे यांनी केले. परंपरेचा वारसा जपणारी श्लोक पाठांतर स्पर्धा ही अतिशय भक्तिमय वातावरणात पार पडली. स्पर्धकांनी आत्मविश्वासाने, स्पष्ट उच्चारांनी आणि भावपूर्ण पद्धतीने श्लोकांचे पठण केले. या स्पर्धेला परीक्षक म्हणून विजया गोखले यांनी काम पाहिले.

प्रत्येक स्पर्धेमध्ये स्पर्धकांची चुरस दिसून आली आणि परीक्षकांना निकाल लावणे अत्यंत कठीण गेले. तरीदेखील सुस्पष्ट निकषांच्या आधारे प्रत्येक गटामध्ये तीन पारितोषिके निश्चित करून विजेत्यांना गौरविण्यात आले.

## पॉवर स्टेशन इमारत बनली धोकादायक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरातील पॉवर स्टेशनची इमारत ९५ वर्षाची जुनी इमारत आहे. हि इमारत धोकादायक स्थितीत असून देखील महावितरण कंपनीकडून त्या इमारतीकडे दुर्लसख केले जात असल्याचे दिसून येत आहे.



माथेरान शहरातील पॉवर स्टेशन इमारतीच्या ठिकाणी मागील २० वर्षांपूर्वी कर्मचारी निवासस्थान बांधण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मात्र त्या इमारतीचे काम पूर्ण झाले नाही आणि आजही अर्धवट स्थिती आहे. परंतु आता त्या इमारतीचे काम अनेक वर्षे अर्धवट राहिल्याने कर्मचाऱ्यांचे निवासासाठी बांधण्यात आलेली इमारत धोकादायक स्थितीत आहे.

इमारतीमध्ये महावितरणचे स्विचिंग स्टेशन आहे. ते पॉवर हाऊसदेखील धोकादायक स्थितीत असून माथेरान पंचवटी भागात असलेले वीज केंद्र इमारत कोसळल्यास अनेक दिवस माथेरान अंधारात जाण्याची भीती आहे. त्या इमारतीमधून स्विचिंग स्टेशनचा कारभार सुरु असताना महावितरण काळजी घेण्याची गरज ग्राहक व्यक्त करीत आहेत.त्याचवेळी भाविषयातील गरज लक्षात घेऊन महावितरण कंपनीने नवीन स्विचिंग स्टेशन आणि पॉवर स्टेशन बाबत पुढाकार घेण्याची मागणी केली जात आहे.

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल** : भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. रोहन बेहरा असे या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहन हा त्याच्या दुचाकीने मासळी बाजारात साहित्य खरेदीसाठी गेला असताना त्याच्या दुचाकीला कारने धडक दिली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात कार चालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## टास्क पूर्ण करण्यास सांगून पाच लाखांची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

टास्क पूर्ण करण्यास सांगून व पैसे मिळण्याचे आमिष दाखवत पाच लाख तीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

ऋषिकेश उपाध्याय हे कामोठे येथे राहतात. त्यांना टेलिग्राम ग्रुपमध्ये जॉइन करून पाच हजार रुपये गुंतवल्यास ७ हजार रुपये मिळतील, असे सांगण्यात आले. त्यावर त्यांनी ही रक्कम भरताच त्यांना टास्कवर सात हजार रुपये आल्याचे दिसले असता, ते पैसे काढण्यास गेले असता, टास्क अर्धवट सोडून चालणार नाही, पुढचा टास्क पूर्ण करा, असे सांगत त्यांच्याकडून पाच टास्क पूर्ण करण्यासाठी एकूण पाच लाख तीस हजार रुपयांची रक्कम ट्रान्सफर करण्यास सांगितली.

त्यानंतर त्यांना पैसे पाहिजे असतील तर चार लाख भरा तरच पैसे मिळतील, अन्यथा ते पैसे कधीच मिळणार नाहीत, असे त्यांना सांगण्यात आले. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी कामोठे पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी तक्रार दाखल केली.

### सोमजाई देवस्थानने जपली परंपरा | धार्मिक उत्सवाला दिले प्रोत्साहन

# चित्रपटगृहात श्रीवर्धनचा पहिला सार्वजनिक गणेशोत्सव

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**श्रीवर्धन येथील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव श्रीवर्धन सिनेमा थिएटरमध्ये सुरू करण्याचे मोठे कार्य थिएटरचे मालक स्व.विनायक मापुस्कर यांनी केले. आज त्यांच्या पश्चात सोमजाई देवस्थानने ती परंपरा सुरू ठेवली आहे.**

श्रीवर्धन तालुक्यातील रहिवाशांना एक मनोरंजनाचे साधन उपलब्ध व्हावे या हेतूने श्रीवर्धन शहरातील वाणी आळी येथील उद्योजक विनायक मापुस्कर यांनी १९५८ साली वाणी आळी परिसरात सिनेमा थिएटर सुरू केले. एकशेवीस आसन क्षमता असलेल्या थिएटर मध्ये ऐतिहासिक चित्रपटाबरोबर मनोरंजन करणारे मराठी व हिंदी चित्रपटाचा खेळ रात्री नऊ ते बारा या वेळेत दाखवण्यात यायचा.



श्रीवर्धन शहरात घरगुती गणपतीचे प्रमाण अधिक होते परंतु सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना तालुक्यात कुठेच केली जात नव्हती. श्रीवर्धनमध्ये सार्वजनिक गणपती हवा या हेतूने मापुस्कर व त्यांच्या मित्र मंडळींनी श्रीवर्धन शहरातील पहिल्या सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना १९६० सालात श्रीवर्धन सिनेमा थिएटरमध्ये केली. श्रीवर्धनमध्ये पहिलाच सार्वजनिक गणपती असल्यामुळे गणपती हा अनंत चतुर्दशी पर्यंत ठेवायचा असा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी सिनेमा थिएटर मध्ये फक्त रात्री नऊ ते बारा चा एकच खेळ दाखवला जायचा त्यामुळे पडद्याच्या एका बाजूला गणपतीची आरास केली जायची. पहिल्या सार्वजनिक गणपतीची ख्याती तालुक्यात पसरल्यावर खेडेगावातील मंडळी भजने, बैठक खेळ सादर करावयास येऊ लागले.अनेकदा सिनेमा थिएटरमध्ये होणारा एकमेव नऊ ते बाराचा खेळही रद्द करावा लागायचा.

### सोमजाई देवस्थानने जोपासली परंपरा

**कालांतराने सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना श्री सोमजाई देवस्थान ट्रस्ट सौजन्याने सोमजादेवी मंदिरात होऊ लागली.आजही श्रीवर्धन मधील पहिला सार्वजनिक गणपती हा अनंत चतुर्दशी पर्यंत ठेवला जातो. गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत दररोज गणेशमूर्तीची पूजा सेवा सकाळ, संध्याकाळ आरती तसेच स्थानिकांची भजने,बैठक खेळ याबरोबर श्रीवर्धन तालुक्यातील विविध भजन मंडळे सोमजादेवी मंदिरात भजनांचे सादरीकरण करतात.तालुक्यातील भाविकांबरोबरच शहरातील भाविक मंदिरात प्रतिष्ठापना झालेल्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येतात.**

# चिरडण्याची तयारी?

मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत वेगवेगळी मते असू शकतात. पण गेले तीन दिवस मराठा आंदोलकांना फडणवीस सरकार ज्या रीतीने वागवत आहे ती निव्वळ क्रूर असून आंदोलन चिरडण्यासाठीची ही पूर्वतयारी असावी अशा संशयाला जागा निर्माण झाली आहे. आपण २९ ऑगस्टपासून मुंबईत उपोषण करणार हे जरांगे गेले चार महिने सांगत होते. या सर्व काळात फडणवीस सरकारने त्यांच्याशी चर्चा करण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. विधानसभा निवडणुकांमध्ये मराठा समाजाचे उमेदवार उभे करण्यावरून फाटाफूट झाली. निवडणुकीत भाजपला अभूतपूर्व यश मिळाले. त्यामुळे मराठा आंदोलनाची ताकद संपली व जरांगे यांच्यामागे कोणीही उभे राहणार नाही असा सोईस्कर समज बहुदा फडणवीसांनी करून घेतला. पण जरांगे आपल्या आंदोलनाची तयारी गेले अनेक आठवडे करीत होते. त्यांच्या काही सभाही झाल्या. त्यांना मिळणारा प्रतिसाद आणि ही तयारी यांचे अहवाल गृह खात्याकडून फडणवीसांना मिळाले असतीलच. त्यांच्याकडे त्यांनी एकतर दुर्लक्ष केले असावे किंवा गृह खाते जरांगेच्या शक्तीचा अंदाज घेण्यास कमी पडले असावे. यातली कोणतीही शक्यता खरी धरली तरी त्यातून गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांची अकार्यक्षमताच दिसून येते. तिसरी शक्यता ही की, जरांगे यांना अनुल्लेखाने मारायचे असे पहिल्यापासून ठरवलेले असावे. हे किती काळ आंदोलन करतील असा सत्तेचा माज त्यामागे असावा. आता मुंबईत आंदोलकांची जी कोंडी केली जात आहे त्यामागे हाच माज दिसून येतो. शुक्रवारी जरांगे यांचे उपोषण सुरु झाले. मराठवाड्यातून २५ ते ५० हजार आंदोलक मुंबईत दाखल झाले. मात्र त्यांना अन्नपाणीदेखील मिळू नये असा बंदोबस्त फडणवीसांच्या सरकारने केला. बोरीबंदर स्थानकातील खाण्यापिण्याचे स्टॉल्सदेखील बंद करण्यात आले. स्वच्छतागृहांना कुलुपे लावून ठेवण्यात आली. सुदैवाने इतके होऊनही आंदोलकांचे वर्तन आदर्श म्हणावे असे राहिले. त्यांनी शांतता बाळगली. कोठेही अद्यापपर्यंत तरी उद्रेक झालेला नाही. पहिल्या दिवशी यावर बराच ओरडा झाल्यानंतर शनिवारी थोडीफार हॉटेल्स वगैरे उघडी ठेवण्यात आली. बाकीच्या सोईही देण्यात आल्या. पण आंदोलकांना भिकारी किंवा गुन्हेगारांपेक्षाही भयंकर वागणूक देणाऱ्या या सरकारची वृत्ती बदलली नाही.

## आडून हल्ले

जरांगे यांच्या आंदोलनासाठी रोज एक दिवसाची परवानगी देणे हा या नीच व खुनशी वृत्तीचा आणखी एक नमुना आहे. नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून विरोधकांची आंदोलने चिरडून टाकण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबले जात असतात. दिल्लीत शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या वेळी त्यांच्या मोर्चाला अडवण्यासाठी रस्त्यात खिळे ठोकण्यात आले व तारांची कुंपणे उभारण्यात आली. महाराष्ट्रात मध्यंतरी पॅलेस्टिनी प्रश्नावर कम्युनिस्ट पक्षाला निदर्शने करण्यासाठी परवानगी नाकारण्यात आली. जरांगे यांचीही अशीच अडवणूक चालू आहे. एकीकडे लोकशाहीत शांततेने आंदोलने करण्याचा हक्क आहे असे म्हणायचे आणि दुसरीकडे आंदोलन खलास करण्यासाठी वाटेल त्या थराला जायचे असा या सरकारचा दगलबाज व ढोंगी व्यवहार राहिला आहे. आझाद मैदानात शांततेने आंदोलन करण्याचा मुंबईतील गणेशोत्सवाला आतापर्यंत तरी कोणताही अडथळा झालेला नाही. एकाएकी इतके आंदोलक आल्याने वाहतुकीची कोंडी झाली, रेल्वे स्टेशनांवर गैरसोय झाली हे खरे आहे. पण सरकारने आडमुठी भूमिका घेतली नसती तर तेही झाले नसते. हे वातावरण तापलेले असताना मुख्यमंत्री काही लोकांच्या घरी वा कार्यालयांमधील गणपतींच्या दर्शनाला जात होते. या काळात सरकारने जरांगे यांच्या भेटीसाठी आपला एकही प्रतिनिधी पाठवला नाही. हे मुद्दाम करण्यात आले. मराठा आरक्षणविषयक उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील नगरला जाऊन बसले होते. दुसरीकडे गणेश हाके यांच्यासारखे तथाकथित ओबीसी नेते वाटेल ती वक्तव्ये करीत होते. हे हाके पूर्वी भाजपचे प्रवक्ते होते व अजूनही छुप्या रीतीने फडणवीसांसाठीच काम करतात. जरांगे यांच्या आंदोलनाआडून सरकार पाडण्याचा डाव असून त्यात अजित पवारांचे नेतेही सामील आहेत असे आरोप ते करीत होते. दुसरीकडे गुणवंत सदावर्ते नावाच्या इसमाने, उच्च न्यायालयाने जरांगे यांना आझाद मैदान नाकारले अशी बातमी पसरवली होती. असल्या लोकांच्या आडून जरांगेंवर हल्ले करण्यातून सरकारची क्षुद्र वृत्ती प्रकट होते.

## एकनाथ शिंदे गायब

कुणबी व मराठा एकच समजावेत आणि मराठ्यांना सरसकट ओबीसी म्हणून आरक्षण द्यावे असे जरांगे यांचे म्हणणे आहे. त्यात कायदेशीर व इतर अडचणी नक्कीच आहेत. मात्र याबाबत त्यांच्याशी आधीच चर्चा होणे आवश्यक होते. जरांगे गेल्याच वर्षी आझाद मैदानात यायला निघाले होते. त्यावेळी त्यांना नवी मुंबईत रोखण्यात आले. मराठा म्हणून एका घरात आरक्षण मिळाले की त्याच्या सर्व सग्यासोयऱ्याला आरक्षण मिळेल असे आदेश काढण्याचे मान्य करण्यात आले. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून त्याचे श्रेय घेतले. पण प्रत्यक्षात तसा निर्णय झालाच नाही. तो होणारही नव्हता हे गेल्या वर्षी याच स्तंभातून आम्ही सांगितले होते. पण तेव्हा जरांगे व लाखो आंदोलकांची फसवणूक करण्यात आली. तीच उघड झाल्याने जरांगे पुन्हा मुंबईत आले आहेत. राज ठाकरे यांनी म्हटल्याप्रमाणे याची जबाबदारी एकनाथ शिंदे यांची आहे. पण ते गुपचूप आपल्या गावी जाऊन बसले आहेत. जरांगे हेदेखील शिंदे यांच्याविरुध्द काही बोलायला तयार नाहीत. तो त्यांच्या डावपेचांचा भाग आहे असे समजू. पण शिंदे यांच्या तेव्हाच्या सरकारात फडणवीस होतेच. त्यामुळे त्या फसवणुकीत तेही सहभागी होतेच. आता तर ते मुख्यमंत्री आहेत. त्यांना तेव्हाची व आताची सर्व जबाबदारी घ्यावी लागेल. ती घेण्याऐवजी ते जरांगे यांच्याशी चर्चा करण्यात टाळाटाळ करीत आहेत. यातून मराठा आंदोलकांचा संताप वाढतो आहेच, शिवाय, ओबीसींमधील अस्वस्थताही वाढत चालली आहे. याचा कोणत्याही क्षणी स्फोट होण्याचा धोका आहे. मराठा व ओबीसी आंदोलकांमध्ये पुन्हा एकदा पूर्वीसारख्या शाब्दिक मारामाऱ्या सुरू झाल्याच आहेत. फडणवीस व भाजपवाले आपण ओबीसींच्या बाजूने आहोत असे दाखवत बाजूला उभे राहून मजा पाहत आहे. वास्तविक सरकार हे सर्व घटकांचे आहे. समजा मराठ्यांच्या मागण्या गुंतागुंतीच्या असल्या तरी त्यांच्या आंदोलनाचा सहानुभूतीने विचार करणे व आंदोलकांशी निदान चर्चा करणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे. पण पहिल्या तीन दिवसात सरकारने यांना वाऱ्यावर सोडले आहे. शनिवारी सरकारने निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांना जरांगेंच्या भेटीला पाठवले. कुणबी मराठा नोंदी तपासणे हे काम असलेल्या समितीचे शिंदे हे प्रमुख आहेत. त्यांनी सरकारच्या वतीने चर्चेला यावे हेच विचित्र आहे. आता विखे वगैरे लोक जरांगेंना भेटतील. पण सरकारची एकूण भूमिका पाहता हे आंदोलन दडपण्यासाठी संधीची वाट पाहिली जाते आहे काय असा संशय येतो.

---

**विचार**

# विश्व अवघे गणेशमय

***बुद्धिदाता, कलांचा अधिपती, विघ्नहर्ता गणेश घरोघरी स्थानापन्न झाला आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. मात्र या सगळ्याचा आनंद लुटत असताना सामाजिक भान, जाचणाऱ्या प्रश्नांचे गांभीर्य आणि त्यांच्या निराकरणासाठी या उत्सवाचा प्रभावी उपयोग करुन घेण्याचे वैचारिक धोरण नेमके असण्याची गरज आहे. स्वार्थाविना एकत्र येणाऱ्या समाजाने या मंगलकाळाचा योग्य उपयोग करणे उत्तम.***



**उर्मिला राजोपाध्ये**

घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये गणेशाची विधीवत स्थापना होऊन उत्सवातील उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. गणपतीबरोबर येणाऱ्या ज्येष्ठागौरींचे लाडकोड पुरवल्यानंतर, माहेरपण यथासांग पार पडल्यानंतर उत्सवातील उरलेले दिवस अधिक मोकळेपणाचे जातील. एकंदरच हा सर्व काळ कुटुंबाने एकत्रित येण्याचा, कामांचे योग्य वाटप करुन आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा, यायोगे संस्कारांची अलगद पखरण होण्याचा, घरातील परंपरा नव्या पिढीपर्यंत अलगद पोहोचवण्याचा... त्यामुळेच म्हटले तर हा एक धार्मिक उत्सव आहे आणि म्हटले तर समाजातील सुप्त शक्ती प्रेरित करण्याचा, समाजभान जागृतीचा, नवनवीन विषयांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठीचा एक प्रघातही आहे. त्यामुळे पाहू तितक्या अंगाने त्याची वेगवेगळी रुपे दिसतात आणि त्या त्या अनुरुप त्याचे महत्त्व वा उपयुक्तता अधोरेखित होते. या काळात गणेशाचे भाविक सुखावतात तसेच व्यापारी, उद्योजक, कारागिर, विक्रेते, नोकरदार, विद्यार्थी असे सगळेच सुखावतात. सणांच्या मोठ्या पर्वाचा प्रारंभ करणारे हे दिवस आर्थिक बरकतीचीही सुरूवात असते. तेव्हा त्याचे महात्म्य गणरायाच्या पार्थिव मूर्तीइतकेच प्रसन्नता देऊन जाते, हे नक्की. आताही असे उल्हसित वातावरण अनुभवास मिळत आहे. चांगली बाब म्हणजे मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या पावसाने पाण्याची चिंता मिटवली आहे. त्यामुळेच यंदाचा गणेशोत्सव भरल्या पोटी, भरलेल्या जलकुंभांनिशी साजरा होतोय. काही भागात पावसाने अतिरेक केला तर कुठे ओढ दिली... मात्र एकंदर स्थिती समाधानकारक असल्यामुळे चिंतामुक्त गणेशोत्सव असे सध्याच्या वातावरणाचे वर्णन नक्कीच करता येईल.

या काळात अतिउत्साही गर्दीमुळे होणारी वाहतूक कोंडी, मंडपांच्या भाऊगर्दीत रस्ते हरवल्याने कामावर पोहोचण्यासाठी करावी लागणारी कसरत, चढ्या भावाने मिळणाऱ्या वस्तू या आणि अशा गोष्टी अंगवळणी पडल्या आहेत. सोन्या-चांदीने किमतीची उच्च पातळी गाठल्यानंतरही या अनमोल धातूंचे अलंकार श्रींसाठी वा आपल्यासाठी खरेदी करण्यासाठी झालेल्या तुडुंब गर्दीने हे सरावलेपण वा स्विकार दाखवून दिला आहे. तेव्हा गणेशोत्सवाबरोबर पुढच्या काळातही असाच माहोल राहील. अर्थातच हे करताना उत्सवातील शूचिता, स्वच्छता आणि सभ्यता राखायला हवी. या बुद्धीच्या देवतेची पूजा करताना प्रत्येक कृतीमध्ये बुद्धीचा वापर असावा. आपण करतोय ते योग्य आहे का? ते समाजाला उपकारक आहे का? त्याने समाजाला काही चांगले मिळणार आहे का? हा विचार प्रत्येक क्षणी मनात असेल तर साजरा झालेला उत्सव निश्चितच मंगलमय असेल. गणेशोत्सवामध्ये नवनव्या जाणिवांची प्राप्ती व्हावी म्हणून बुद्धी सजग ठेवण्याचा प्रयत्न व्हायला हवा. गणपती हा गणांचा अधिपती असल्याने समाजाच्या सुखदुःखाकडे दुर्लक्ष करणार नाही याची खात्री आहे. आज समाजाचे अनेक प्रश्न आहेत. नैसर्गिक आपत्ती आहे, सामाजिक भय आहे, दहशतीचा प्रश्न कळीचा ठरतो आहे. या सर्वांचे भान ठेऊन उत्सव साजरा करण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असावा. उत्सव म्हणजे उत्+सव. यामध्ये उत् म्हणजे ईश्वर तर सव म्हणजे प्रकटणे. उत्सवाच्या रूपाने ईश्वर प्रकटतो. हे लक्षात ठेऊन प्रत्येक कृती होणे गरजेचे आहे.

सध्या उत्सवाचे बाजारीकरण झालेले दिसते. हे असेच सुरू राहिले तर पुढची पिढी गणपतीलाच गणेशोत्सवाचे विघ्न दूर कर, असे साकडे घालेल. हे टाळायचे असेल तर सामाजिक प्रश्नांप्रती भान ठेऊनच या उत्सवाकडे बघणे ही काळाची गरज आहे. आपण ती लक्षात घ्यायला हवी. सध्याचे सामाजिक प्रश्न लक्षात घेता उत्सवाला प्रचारापेक्षा प्रबोधनाच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न केंद्रस्थानी असायला हवा. गणेशोत्सवात उत्साहाचे उधाण येणे स्वाभाविक आहे. यात कोणीही मागे राहू नये. सर्वांनीच यामध्ये सामील व्हावे. गणेश बुद्धिदाता, संपन्नतेचा दाता आहे. त्याच वेळी 'गणपती' म्हणजे जनदैवत आहे हे ही विसरता कामा नये. घरात पूजले जाणारे हे दैवत लोकमान्य टिळकांनी समाजात आणले. हेतू हा की, या निमित्ताने समाज एका समान श्रद्धासूत्रात बांधला जाईल. समाजमनावर एकता आणि समरसतेचे संस्कार होतील. हा हेतू मोठ्या प्रमाणात साध्य झाला आणि गणेशोत्सव हा 'वस्ती' पातळीवरील नेतृत्वाचे विद्यापीठ बनला. पण या विद्यापीठातून पुढे येणाऱ्या नेतृत्वाने समाजप्रबोधन करणे अपेक्षित आहे. त्याने समाजाला विधायक मार्ग दाखवणे गरजेचे आहे. पूजाविधीचा हादेखील एक हेतू आहे. गुणसमुच्चयाला एका मूर्तीचे रूप दिले गेले. उद्देश हा की या गुणांची पूजा करता करता ते आपल्यातही निर्माण व्हावेत. आधी म्हटल्याप्रमाणे 'उत्सव' या शब्दाचा अर्थही 'ईश्वराचे प्राकट्य!' असाच आहे. उपासकाच्या रूपात हे दैवी गुण प्रकट व्हायला हवेत, तरच खरा उत्सव केला जात आहे असे म्हणता येईल.

...पण सध्या गणेशोपासना अशी होते आहे का? हे बुद्धी देणारे दैवत असेल तर आपला प्रत्येक व्यवहार बुद्धिनिष्ठ होतो आहे का? अर्थात बुद्धिनिष्ठ म्हणजे श्रद्धाविहीन नव्हे. बुद्धी योग्यायोग्यतेची क्षमता देणारी शक्ती आहे. मी करत असलेल्या उपासनेत काही अयोग्य तर नाही ना, हे प्रत्येक पावलावर पाहिले पाहिजे. ही साधकाची सावधानता आहे. बुद्धिमान प्रत्येक क्षणी सावधच असला पाहिजे. पहिला मुद्दा आहे शुचितेचा! उत्सवासाठीचे प्रत्येक साधन शुचिर्भूत असले पाहिजे. जमा होत असलेले धन देणारा स्वेच्छने देतो आहे की धाकाने, आलेला प्रत्येक रुपया योग्य पद्धतीने, योग्य त्याच कारणासाठी खर्च होतो आहे ना, स्वेच्छेने धन देणारेही समाजाला हानीकारक गोष्टीतून पैसा कमवत नाहीत ना, ज्या वस्तूंचे उत्पादन समाजाला उपकारक नाही अशांचे आर्थिक साह्य आपण घेत नाही ना, याकडे लक्ष पुरवणे गरजेचे आहे. सावधानतेचा दुसरा पैलू अर्थातच आचरणाशी जोडलेला आहे. उत्सवाच्या जागीच नव्हे, तर सर्वत्रच उत्सवाशी जोडलेल्यांचे वर्तन योग्य आहे ना? वाजवली जाणारी गाणी, दिल्या जात असलेल्या घोषणा सभ्यतेत बसतील अशाच आहेत ना, याकडे लक्ष ठेवायला हवे. हे भान असेल तरच बुद्धिदात्याचे पूजन यथार्थ म्हणता येईल. सामाजिक उत्सवात संपन्नतेचा अर्थ पैशाच्या संपन्नतेशी जोडून चालणार नाही. येथे अभिरुची आणि वैचारिक संपन्नता असाच अर्थ घ्यायला हवा! सार्वजनिक उत्सवात अशी श्रीमंती नसेल तर उत्सव हा उच्छाद होऊन जातो.

विशेषत्वाने गणपती हे जनाचे दैवत आहे. ते समूहाला दिशा दाखवते, सर्वांना पुरुषार्थाची प्रेरणा देते हे मान्य असेल तर प्रत्येक बाब हा हेतू सफल करणारीच असेल याची दक्षता घेतली पाहिजे. काहींना आजघडीला हा उत्सव अनावश्यक वाटू शकतो. त्याला आलेले बाजारू आणि अतिउत्सवी रूप अनेकांच्या विवेकबुद्धीला पटत नाही. व्यक्ती असो, विचार असो की उपक्रम असो; सगळ्याची एक कालसापेक्षता असते. वर्तमानाचे भान ठेऊनच या सगळ्याचा स्वीकार करणे महत्त्वाचे असते. गणेशोत्सव सार्वजनिक करण्यामागचे कारण आज संपले आहे का? प्रबोधन, परिवर्तन, प्रगती यासाठी आजचे गणेशोत्सव उपयोगी आहेत का? तर उत्तर स्पष्ट आहे, 'नाही!' मग उत्सव बंद करावेत का? याचेही उत्तर स्पष्ट आहे, 'नाही!' मग मार्ग कोणता? तर सर्वच उत्सवांना वर्तमानानुकूल बनवणे. हे बुद्धीचे आणि वैचारिक संपन्नतेचे लक्षण ठरेल. कारण पर्यावरणाचा नाश, स्त्रियांचा सन्मान आणि सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा, व्यसनाधीनता हे सर्व प्रश्न आज उग्र रूप घेत आहेत. या आणि अशा समस्यांबाबत आम्ही कसे सावध होऊ शकतो, करोडोंची उलाढाल होणारे उत्सव आम्हाला जनजागृती आणि सामाजिक विवेकासाठी कसे वळवता येतील याबाबत पावले टाकायला हवीत. या उत्सवातून युवाशक्तीला नवे जग आणि नवी आव्हाने पेलण्यासाठी घडवता येईल असे उपक्रम घ्यायला पाहिजेत. दिखावा आणि देखावे यातून बाहेर पडून देखणे समाजजीवन घडवण्यासाठी या उत्सवातील ऊर्जा वापरली जावी. आता 'राज्य उत्सव' अशी मान्यता मिळालेल्या आणि वातावरणात असीम आनंद भरुन टाकणाऱ्या या गणेशोत्सवात हा विचार होत नसेल तर उरलेल्या दिवसांमध्ये तो केला जाईल हीच अपेक्षा.

---

**चर्चा आजची**

# आत्महत्या, हा उपाय नव्हे!

**राकेश लोहार**

आपण म्हणतो की, आपला देश कृषीप्रधान आहे. शेती हा आपल्या आर्थिक व्यवस्थेचा कणा आहे. कृषीप्रधान-कृषीप्रधान म्हणून तरी किती दिवस जगायचे? हाच प्रश्न आज आ वासून सर्वच शेतकऱ्यांपुढे उभा आहे. कारणही तसेच आहे म्हणा! मागील महिनाभरापासून राज्यभर कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राच्या बहुतेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. याचा मोठा फटका येथील बळीराजाला बसला असून, मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आपल्याकडील शेती ही आजवरचा इतिहास पाहिला असता, निसर्गाच्या लहरीपणाची कायमच शिकार झाली आहे, हेच दिसून येते. त्याचाच एक भाग आता झालेली अतिवृष्टी.

निसर्गाचा लहरीपणामुळे काय होऊ शकते, हे आता कोणाला सांगण्याची गरज नसावी. हवामान, पाऊसपाणी चांगले असेल, तर शेतकरी काळ्या मातीतून मोती पिकवू शकतो. हो, ती क्षमतादेखील त्याच्यात आहे. पण, निसर्गाची अवकृपा झाली तर, मात्र माती! सर्वकाही खल्लास! होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही. या अतिवृष्टीमुळे बळीराजाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आणि, ते नुकसान कधीही भरुन न येणारे असेच आहे. आपल्या काळ्या कसदार शेतजमिनीतून स्वतःच्या अंगमेहनतीने येथील शेतकऱ्यांनी फुलविलेली शेती, हातातोंडाशी आलेले पीक या अतिवृष्टीने जमीनदोस्त झाले. कोणाची द्राक्षाची बाग, कोणाची चिकू, काजू, पेरुची बाग, आंब्याची बाग जमीनदोस्त झाली. तर, काहींचा गहू, भाजीपाला, कडधान्य पिके मातीमोल झालीत. शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घासच हिरावून नेला आहे. शेतीसाठी शेतकऱ्यांनी लाखो रुपयांची कर्जेदेखील बँकांकडून घेतली आहेत. आता हातात पीक नसताना कर्ज फेडणार कसे? या विवंचेनेत बळीराजा अडकला असताना, आपले राजकारणी मात्र कुरघोडीच्या राजकारणात गुंतलेले दिसत आहेत. सर्वसामान्यांना असल्या घाणेरड्या राजकारणाशी काहीच देणे-घेणे नाही. तरी, राजकारण मात्र सामान्यांना गृहित धरुन सुरू आहे, याची चीड येते. सत्ताधाऱ्यांची अकार्यक्षमतेमुळे शेतकरी पूर्णतः भरडून गेला आहे. मदतीच्या नावाने मात्र बोंब!

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती कमी पडत आहे. ही राजकीय इच्छाशक्ती गेल्या वर्षभरात कुठे आणि काय करत होती, याचा थोडा जरी आपण विचार केला, तर आपल्याला समजून येईल ती लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत होती. आधी लोकसभा आणि त्यानंतर विधानसभा निवडणूक झाली. या दोन्ही निवडणुका जिंकण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी कंबर कसली होती. विजयासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. जनतेचे मूळ समस्यांपासून लक्ष विचलित करण्याचे प्रयत्न केले. आणि, त्यात सत्ताधारी यशस्वी झालेदेखील. परंतु, दरम्यान शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने विसरले. त्यामुळे आपला शेतकरी दुर्लक्षित झाला आहे. होतही आहे. त्यामुळे सातत्याने निसर्गाच्या लहरीपणाच्या तडाख्यात सापडून नुकसानग्रस्त होत आहे. पण, मदतीची वेळ येते तेव्हा त्याच्याकडे सत्ताधाऱ्यांकडून पाठ फिरविली जाते. हे आजचेच नाही, वर्षानुवर्षे सुरू आहे. यामुळेच आज शेतकऱ्याचा आवाजच विरुन गेला आहे. आणि, म्हणूनच आजच्या शेतकऱ्याला शेतीतून बाहेर पडणे, हा एकमेव उपाय समोर दिसतोय. पण, हे का आणि कशासाठी करावे, त्याला कळत नाही. जर शेतकऱ्यांनी शेतीकडे पाठ फिरवली, तर आपण खाणार काय? याचा कधी तरी विचार केला आहे का? शेतकऱ्याच्या जीवावर सर्व राजकारण चालले आहे. परंतु, शेतकरीच आज या सर्वात बाहेर फेकला जात आहे. यावर कधी तरी सत्ताधारी आत्मपरीक्षण करतील का?

सध्याच्या राजकाणाऱ्यांच्या खोटे बोलण्यालासुद्धा काही परिसीमा राहिलेली दिसत नाही. खोटे बोलायचे, आणि, तेसुद्धा रेटून बोलायचे, हेच सर्वांनी सूत्र अवलंबिल्याचे दिसत आहे. नुसता शेतकऱ्यांचा कळवळा आहे, हे दाखविण्यासाठी दौरे काढून, गावभर फिरुन काय होणार नाही. तर, येथील शेतकऱ्याला खरी गरज आहे ती आधाराची. आर्थिक मदतीची. सर्व सोंग घेतात, पण पैशाचे नाही. हीच अवस्था शेतकऱ्याची झाली आहे. हातात पैसाच नाही, मग करणार काय? आणि, खाणार तरी काय? आज लाखो रुपयांचे घेतलेले कर्ज कसे फेडणार, या समस्येमुळे बळीराजा आपली जीवनयात्रा संपवत आहे. मृत्यूला कवटाळत आहे. पण, मला मनापासून वाटते की, बळीराजाने आपला लाख मोलाचा जीव असा संपवून टाकू नये. आत्महत्या करणाऱ्या 'त्या' शेतकऱ्याने एकच विचार करावा की, आपल्यानंतर आपल्या कुटुंबाचे काय होईल? हा 'विचार' ज्याच्या मनात येईल, तो आत्महत्येचे पाऊल कधीच उचलू शकणार नाही. आत्महत्येने काही कर्ज फिटणार नाही, की कमी होणार नाही. ते कुणालाच सुटलेले नाही. त्याची परतफेड करावीच लागणार! म्हणूनच आपल्यानंतर आपल्या कुटुंबावर बोजा टाकण्याऐवजी, पुन्हा एकदा नव्या जोमाने, नव्या उमेदीने आपल्या कुटुंबाबरोबर त्याच शेतीत कष्ट केले, तर पुन्हा तीच शेती चांगली फुलून येऊ शकते. आत्महत्येचा विचार सोडा, आणि नव्या उमेदीने, नव्या जोशाने कामाला लागा.

---

**लोकसंसद**

## वाहतूक कोंडी मोठी समस्या



रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही सध्याची मोठी समस्या बनली आहे. दिवस असो की रात्र, वेळ कोणतीही असो रस्ता कोणताही असो मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई किंवा मुंबईतून कुठेही जाणारे राज्य - राष्ट्रीय महामार्ग सगळीकडे प्रचंड वाहतूक कोंडी दिसते. पूर्वी हे चित्र शनिवार, रविवार किंवा जोडून सुट्ट्या आलेल्या दिवशी व्हायची आता ती रोजच होती. या वाहतूक कोंडीने रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या असतात त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ज्या प्रवासास पूर्वी एक ते दीड तास लागायचा त्याच प्रवासासाठी नागरिकांचा आता दुप्पट वेळ लागत आहे. सकाळ, संध्याकाळ यासारख्या पीक अवरमध्ये तर वाहने अगदी कासव गतीने धावतात. वाढत्या वाहन कोंडीमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहे. ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने उड्डाणपूल केले पण आता त्याच उड्डाणपुलावर वाहनांची कोंडी होताना दिसत आहे. अनेक प्रयत्न करूनही वाहतूक कोंडी कमी करण्यात प्रशासनाला यश येत नाही. वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील मुख्य कारण आहे ते म्हणजे वाहनांची वाढती संख्या. वाढत्या वाहतूक कोंडीला वाहनांची प्रचंड संख्या जबाबदार आहे. आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. दरवर्षी त्यात हजारो वाहनांची भर पडते. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली तशीच पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात परिणामी अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे. पार्किंगची सोय नसल्याने नागरिक रस्त्यांच्या कडेला आपल्या गाड्या पार्क करतात त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शासन, प्रशासनाकडून नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. नवीन वाहन विकत घेऊन नागरिक आपल्या खाजगी वाहनांनी प्रवास करत आहे. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना चांगली सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने जर या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्या तर नागरिक स्वतःच्या वाहनांनी प्रवास न करता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल आणि वाहनाची संख्या कमी झाली की रस्त्यांवरील वाहतूक कोंडी देखील कमी होईल. जर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याची शासन प्रशासनाची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी आधी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करूनच वाहतूक कोंडी रोखता येईल.

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

---

**दिनविशेष**

# आई गौराई गणाची, आली माझ्या गं अंगणी

भारतीय सण-उत्सवांमध्ये भाद्रपद महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. गणेशचतुर्थीच्या आगमनाने सुरु झालेल्या सणाच्या उत्सवात काही दिवसांतच एक अत्यंत मंगल, सौंदर्यपूर्ण आणि श्रद्धेने भारलेला सण साजरा केला जातो तो म्हणजे गौरी पूजन. हा सण विशेषतः महाराष्ट्र, कोकण, कर्नाटक, तामिळनाडू व आंध्रप्रदेशात मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो.

गणपती बाप्पाच्या आगमनानंतर दोन-तीन दिवसांनी गौरी माता घरात येतात. हिंदू धर्मानुसार गौरी म्हणजे माता



पार्वतीचे रूप. त्या लक्ष्मीच्या रूपात समृद्धी देणाऱ्या, दुर्गेच्या रूपात संकटांपासून वाचवणाऱ्या आणि पार्वतीच्या रूपात सौंदर्य व सौभाग्य देणाऱ्या देवी मानल्या जातात. गौरी पूजनाची परंपरा प्राचीन आहे. राक्षसांच्या त्रासामुळे भयभीत झालेल्या स्त्रियांनी गौरी देवीला प्रार्थना केली की त्यांना अक्षय सौभाग्य आणि रक्षण लाभावे. गौरीने त्यांना अभयदान दिले आणि राक्षसांचा नाश केला. तेव्हापासून सौभाग्य व समृद्धीसाठी गौरी पूजन साजरे केले जाते. गौरी पूजन हा सण भाद्रपद शुद्ध तृतीया ते पंचमी दरम्यान साजरा होतो. अनुराधा नक्षत्रावर गौरी आगमन, ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन व जेवण, आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन होते. या दरम्यान घरात अत्यंत पवित्र व प्रसन्न वातावरण असते. घराघरांत गौरींचे स्वागत रांगोळी, तोरणे, सजावट, फुलांची आरास, हळदीकुंकू आणि पक्वान्नांनी केले जाते. गौरी येतात त्या दिवशी घराच्या अंगणात सडा रांगोळी घालून त्यांच्या पावलांचे चिन्ह दारापासून घरात उमटवले जाते. या पावलांचा अर्थ असा की देवीचे पवित्र चरण आता आपल्या घरात आले आहेत. त्यांच्यामुळे घरातील कोपरा-कोपरा समृद्धीने भरून निघो, अशी स्त्रियांची भावना असते. गौरी पूजनामध्ये स्त्रिया विशेषतः नटूनथटून देवीला समर्पित अर्पण करतात. सांगत्या (मंगळसूत्र), वस्त्र, अलंकार, बांगड्या, कुंकू, फुले, हार, सुपाऱ्या, नारळ, फळे व पक्वान्न अर्पण केले जातात.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ सप्टेंबर

१) श्री. विजय तुकाराम चव्हाण
श्रीबाग, अलिबाग, १-९-१९४८
२) श्री. प्रभाकर मोतीराम धनावडे
अलिबाग, १-९-१९३७
३) श्रीम. मालती प्रभाकर बोंद्रे
वरसोली, अलिबाग, १-९-१९४०
४) श्री. अभिमन्यू नारायण कोळी
नवगाव, अलिबाग, १-९-१९५०
५) श्रीम. देवकू अभिमन्यू कोळी
नवगाव, अलिबाग, १-९-१९४९
६) श्रीम. शरयू सुरेश गुरव
थळ, अलिबाग, १-९-१९५५
७) श्री. हरिश्चंद्र शांताराम ठाकूर
थळ, अलिबाग, १-९-१९५४
८) श्री. बाळासाहेब सदाशिव बनसोडे
अलिबाग, १-९-१९५७
९) श्री. अनिल हरिश्चंद्र थळे
अलिबाग, १-९-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## सुवर्णकण



सत्कर्म सदाचार सद्विचार यांचा परिपाक
सहजच देवी सामर्थ्य मध्ये होतो
हरिनाम हे उपाधीरहित तसेच अत्यंत
शक्तिमान साधन असल्यामुळे
त्याचा परिणाम
हवे ते साध्य करण्यात होतो.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## अजगरास जीवदान

**पालघर :** पालघर तालुक्याच्या पूर्वे कडील वरई पारगाव रस्त्यावरील नावझे गावात मासे पकडण्यासाठी लावलेल्या जाळ्यात सोमवारी सकाळी एक दहा ते बारा फूट लांबीचा अजगर अडकल्याचे आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. सर्पमित्राच्या मदतीने अजगराची जाळ्यातून सुरक्षितपणे बाहेर काढून अजगराला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

नावझे गावातील शेतकरी रमेश पाटील यांनी त्यांच्या शेतात मासे पकडण्यासाठी जाळे लावले होते. सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे शेतावर जाळे तपासण्यासाठी गेले असता त्यांना जाळ्यात एक मोठा अजगर अडकलेला दिसला. सुमारे दहा ते बारा फूट लांबीचा अजगर जाळ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. या प्रयत्नात अजगर जाळ्यात अधिकच गुरफटला गेला होता.

एका स्थानिक सर्पमित्रांशी संपर्क साधून जाळ्यात अडकलेल्या अजगराची माहिती दिली. थोड्या वेळात सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक अजगराला जाळ्यातून बाहेर काढून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## ठाण्यात धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्य

**ठाणे :** ठाण्यात धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतीमध्ये नागरिकांचे वास्तव्य असून अशा इमारतीमध्ये अजूनही तब्बल ८० हजार कुटुंबे राहत आहेत. एकदा राहते घर सोडले की हक्काचा निवारा गमावून बसण्याच्या भीतीपोटी रहिवाशी इमारती रिकाम्या करण्यास तयार नाहीत. या इमारती रिकाम्या करताना पालिका प्रशासनाची मात्र चांगलीच दमछाक होत आहे..विरारच्या घटनेनंतर ठाण्यातील अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# महामार्गावर वाहतूक कोंडी

## ● सामान्य वाहतूकदारांना भुर्दंड ● रस्त्यावर कंटेनरच्या रांगाच रांगा

**| उरण | प्रतिनिधी |**

**मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक बंद केल्याने शुक्रवारी सकाळपासूनच जेएनपीए बंदरात आणि बंदरातून जाणारी हजारो कंटेनर वाहने अडकून पडली होती. जेएनपीए बंदर ते करळ उड्डाणपूल, द्रोणागिरी औद्योगिक परिसर धुतुम, चिर्ले ते गव्हाण फाटा अशा तब्बल बारा ते पंधरा किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर कंटेनरच्या रांगाच रांगा लागल्या होत्या.**



उरण शहराकडे उरणच्या पूर्व भागाकडे जाणारे असे सर्वच मार्ग बंद झाले होते. त्यामुळे जाणारे येणारे प्रवाशी जवळजवळ चार ते पाच तास वाहतूक कोंडीत अडकून राहिले होते. तर या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका हा व्यवसायिकांसह वाहतूकदारानां बसला असल्याची खंत व्यक्त केली आहे.

मराठा आंदोलकांचा ताफा मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी जेएनपीटी महामार्गकडून आल्याने सर्व अवजड वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. या वाहतूक कोंडीमुळे जेएनपीएच्या व्यवसायावर फटका बसला आहे. वाहतूकदारांना या वाहतूक कोंडीचा मोठया प्रमाणात बसला. जेएनपीएट घेऊन जाणारे कंटेनर आणि आणि आयतीचे आलेले कटेनर आणण्यासाठी विलंब झाला. वाहतूक कोंडी मुळे निर्यातसाठी जाणारे कंटेनर व्हेसलंचा कटाफ झाल्याने शट आऊट झाले त्यामुळे हा सर्व भुदंड वाहतूकदारांवर बसला आहे.

> जेएनपीए मार्गावर अनेक वेळा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वाहतूक कोंडी झाली आहे. मात्र या वाहतूक कोंडीचा फटका वाहतूकदारांना भोगावा लागला आहे. कंटेनर वेळेवर न पोहचल्यामुळे जे चार्जेस लागतात ते आम्हाला भरावे लागतात. अशा कोणत्याही कारणाने पोर्टची वाहतूक बंद न ठेवता सुरळीत ठेवावी जेणेकरून वाहतूकदारांना भुदंड बसणार नाही.
>
> **– पंढरीनाथ गांजवे**
> **रायल ट्रान्सपोर्ट प्रमुख**

## डीबीजेत रानभाज्यांचे प्रदर्शन

**चिपळूण :** चिपळूण येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे कनिष्ठ महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षातर्फे नुकताच रानभाज्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सध्याच्या फास्ट फूडच्या जमान्यात विद्यार्थ्यांना आपल्या कोकणात पावसाळ्यात ज्या विविध रानभाज्या येतात त्यांची ओळख व्हावी यासाठी महाविद्यालयात विविध रानभाज्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनात आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या रानभाज्या आणल्या. यामध्ये टाकळा, भारंगी, पेवा, कुडा, आळू अशा विविध रानभाज्या होत्या. ३८ विद्यार्थीनींनी वेगवेगळ्या भाज्या या प्रदर्शनात मांडल्या होत्या.



**पनवेल शहरात जैन समाजाच्या वतीने पर्युषण उत्सवानिमित्त भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीत धर्मगुरुंसह महिला वर्ग, युवक, तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. (छायाचित्रः राजेश डांगळे)**

## रसायनी-पाताळगंगा मराठा समाजाकडून रसद

**| रसायनी | वार्ताहर |**

मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणास बसले असून त्यांच्याबरोबर गेलेल्या सकल मराठा बांधवांची जेवणामुळे हाल होऊ नये यासाठी खालापूर तालुक्यातील चौक, रसायनी,पाताळगंगा,कासप,चावणे,आपटा, परिसरातील सकल मराठा समाजाकडून पाणी बॉटल बॉक्स, भाकरीसह जेवणाचे साहित्य मुंबईकडे रवाना करून मराठा बांधवांना रविवार दि.३१ रोजी दुपारी वाटप करण्यात आले.




## फळे-फुलांच्या दरात वाढ

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रत्नागिरी जिल्ह्यात लाडक्या गणरायाचे आगमन जल्लोषात झाले असून, बाजारपेठा भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्या आहेत. पूजेसाठी फुले, फळे आणि इतर साहित्याच्या दरात तब्बल ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. गौरी-गणपती उत्सवानिमित्त फुलांचा आणि फळांचा बाजार चांगलाच बहरला आहे. मात्र, काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका फुलशेतीला बसला आहे. विशेषतः झेंडू, शेवंती, निशिगंध या फुलांचे मोठे नुकसान झाल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी झाला आहे. याचा थेट परिणाम दरांवर झाला असून, फुलांच्या किमतीत ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. फुलांप्रमाणेच फळांचे दरही वाढले आहेत. सफरचंद, केळी, पेरू, डाळिंब आणि गोड लिंबू या फळांचेही दर वाढले आहेत.




## दिलीप कदम यांची शेकापक्षाच्या अध्यक्षपदी निवड

**| रसायनी | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाच्या शहर अध्यक्षपदी दिलीप शंकरराव कदम यांची निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दिलीप कदम हे पनवेल महानगर पालिकाचे सेवा निवृत्त अधिकारी आहेत. सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्त असून अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाचे सल्लागार पदावर आहेत, कोयना क्षत्रिय मराठा समाज संघांचे माजी सरचिटणीस व माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. सद्या ते दि-पनवेल को ऑपरेटिव्ह बँकेचे विद्यमान संचालक आहेत. कोयना वसाहत करंजावडे धरणा कॅम्प गावचे ते रहिवाशी आहेत.

शेतकरी कामगार पक्षाचे ते निष्ठावंत आणि सक्रिय कार्यकर्ते आहेत, शेतकरी कामगार पक्षाच्या जडणघडणीत त्यांचा वाटा आहे. पक्षात निष्ठेने काम केल्याने त्यांना पक्षाने न्याय दिला आहे. येणाऱ्या महानगर पालिका निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष विजयाच्या उंबरठ्यावर पोहचला असल्याची प्रतिक्रिया अनेक कार्यकर्ते यांनी बोलून दाखवली आहे. माजी आ. बाळाराम पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## अंतर्नाद कला अकादमीत आवाज कार्यशाळेचे आयोजन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत शहरात कार्यरत असलेल्या अंतर्नाद कला अकादमी अभिनयाचे तांत्रिक ज्ञान देणारी एकदिवसीय आवाज कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला नामवंत रंगकर्मी, कलाकार यांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन तांत्रिक माहिती घेतली. प्रसिद्ध रंगकर्मी प्रा. उमेश घळसासी यांनी कार्यशाळेत जमलेल्या इच्छुकांना मार्गदर्शन केले.

अंतर्नाद कला अकादमीच्या स्थापनेमागील उद्देश म्हणजे, कर्जतच्या भावी पिढीला कला शिकण्यासाठी मुंबईसारख्या महानगरात खर्चिक पद्धतीने धाव घ्यावी लागू नये. कर्जतमधीलच नामवंत रंगकर्मी, कलाकार यांच्या अनुभवाचा उपयोग करून येथील तरुणाईला थेट मार्गदर्शन मिळावे, यासाठी अकादमी कार्यरत असल्याचे अकादमीचे राहुल वैद्य यांनी स्पष्ट केले. कला क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांना योग्य संधी व प्रशिक्षण मिळावे, याच भावनेतून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस रंगकर्मी प्रा. उमेश घळसासी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आवाजाच्या विविध अंगांबाबत सखोल मार्गदर्शन करत नाट्यकला, अभिनय, निवेदन या क्षेत्रात आवाजाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी अभिनेता मकरंद पाध्ये व ज्येष्ठ रंगकर्मी जुगलकिशोर जी ओझा हे विशेष उपस्थित होते.कर्जतचा लौकिक वाढवणारे चित्रकार पराग बोरसे, संतोष दगडे, महेश वैद्य, सतीश श्रीखंडे, महेंद्र निगूडकर यांसारख्या मान्यवरांनी विद्यार्थीदशेत कार्यशाळेत सहभागी होऊन कलेविषयीची आपली आस्था व्यक्त केली.

## करूळ घाटात दरड कोसळली

**वैभववाडी :** तालुक्यात सुरू असलेल्या जोरदार पावसाने करूळ घाटात सूर्यास्त पॉईंटनजीक दरड कोसळल्यामुळे काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. वाहनचालकांनी रस्त्यावर आलेले दगड बाजूला करून एकेरी वाहतूक सुरू केली. शनिवारी सकाळी ११.३० वा.च्या सुमारास ही दरड कोसळली.

## कुडाळमध्ये रेकॉर्ड ब्रेक पाऊस

**| कुडाळ | प्रतिनिधी |**

कुडाळ तालुक्यात आतापर्यंत सरासरी २८६५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गेल्या काही वर्षात तालुक्यात विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. मात्र त्या तुलनेत तालुक्यात पडझड अथवा पूरस्थिती निर्माण झालेली नाही.

तालुक्यात आतापर्यंत दोन हजार ८६५ मि मी. पाऊस पडला आहे. यावर्षी पावसाला मे महिन्याच्या मध्यावधीपासूनच सुरुवात झाली आहे. यावर्षी सुमारे ३ हजार ४०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अजूनही सप्टेंबर, ऑक्टोंबर महिना बाकी आहे. दरम्यान परतीच्या पावसाचा जोर जास्त असतो त्यामुळे पाऊस मोठ्या प्रमाणात पडण्याची शक्यता आहे. केल्यास तालुक्यात यावर्षी पाऊस किमान ५ हजार मिमीचा टप्पा गाठण्याची शक्यता आहे.

## किल्ल्यांचा देखाव्यातून गडसंवर्धनाचा संदेश | मराठी शाळा व भाषेसाठी जनजागृती

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

**| पाली | प्रतिनिधी |**

**विधायक व पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी काहीजण पुढाकार घेत आहेत. पालीतील अंबिके कुटुंबीयांनी गणरायासमोर जागतिक वारसा मिळालेल्या बारा किल्ल्यांचा देखावा केला आहे. रोहा तालुक्यातील कोलाड येथील सागर दहिंबेकर यांनी फळे फुले वर्षावनांचा देखावा केला आहे. तर रोहा तालुक्यातील वांगणी येथील शिर्के कुटुंबियांनी मराठी शाळा व भाषेसाठी जनजागृती करण्यासाठी देखावा बनवला आहे. या माध्यमातून पर्यावरणाचे संवर्धन तर होतेच मात्र जनजागृती व प्रबोधन देखील होत आहे.**




दरवर्षी घरगुती गणेशोत्सवातून सामाजिक संदेश देणाऱ्या अंबिके कुटुंबाने या वर्षी गजर गणरायाचा, सन्मान महाराष्ट्राच्या अस्मितेचा या संकल्पनेतून एक अनोखा देखावा साकारला आहे. जागतिक वारसा समितीने भारताच्या मराठा साम्राज्यातील लष्करी बांधणीच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा दिला आहे. याच ऐतिहासिक घटनेचा धागा पकडत कुटुंबाने या १२ किल्ल्यांची भव्य प्रतिकृती आपल्या घरात उभारली आहे. या देखाव्यात महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूमधील एका किल्ल्याचा समावेश आहे. जागतिक वारसा मिळवण्याचा प्रवास आणि त्याचे फायदे, अशा अनेक गोष्टींचे दर्शन या देखाव्यातून घडत आहे.

> **पर्यावरण पूरक घरगुती गणेशोत्सवाच्या माध्यमातून अनेक महत्त्वपूर्ण बाबी लोकांसमोर मांडता येतात आणि त्याद्वारे जनजागृती व प्रबोधन घडवता येते. अनेकजण यासाठी पुढाकार घेताना दिसत आहेत. घरगुती गणेशोत्सव सजावट अंतर्गत यावर्षी ऐतिहासिक तितकाच पर्यावरणपूरक सामाजिक संदेश व माहितीपूर्ण देखाव्याद्वारे जनजागृती केली आहे.**
>
> **-राजेंद्र अंबिके,**
> **राज्य आदर्श शिक्षक, पाली**

## निवडक

### विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची निर्मिती

**सुधागड :** पर्यावरणपूरक गणपती विसर्जनासाठी पाली नगरपंचायतीतर्फे पाली आगरआळी येथील एसबीआय बँके समोरील मोकळ्या मैदानात कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. नगरपंचायत मार्फत सूचना देण्यात आल्या आहेत की पर्यावरण पूरक विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचा वापर करा. प्लास्टर ऑफ पॅरिस व रासायनिक रंग वापरलेली तीन फुटावरील गणपती मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित करू नयेत. फुल, हार, नारळ, सजावट साहित्य इत्यादी वेगळ्या दिलेल्या निर्माल्य कलशामध्ये टाका. मूर्तीचे विसर्जन तलावात शांतपणे करा, प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल पाण्यात टाकू नयेत. सुरक्षेकरिता नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करा. लहान मुलांना तलावाच्या काठाजवळ एकटे सोडू नका. कृत्रिम तलावात साबण, डिटर्जंट, तेल ओतू नका. मूर्ती विसर्जन केल्यानंतर परिसर स्वच्छ ठेवा. स्वच्छता राखा-पर्यावरण वाचवा असे नगरपंचायत मार्फत आवाहन करण्यात आले आहे.

### कोकणातील नाच मंडळाने आणली रंगत



**नागोठणे :** सध्या गणेशोत्सवानिमित सर्वत्र विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची धामधूम पाहायला मिळत आहे. आपल्या लाडक्या बाप्पांचे जागरण करण्यासाठी खासगी व सार्वजनिक बाप्पांच्या स्थापनेच्या ठिकाणी आयोजित कार्यक्रमांची सर्वत्र धम्माल सुरू आहे. असे असतांनाच नागोठण्यातील भाई टके यांच्या पांडुरंग निवास या निवासस्थानी शनिवारी (दि.३०) आयोजित केलेल्या कोकणातील भजन व शक्ती नाच मंडळाने आपल्या कलेतून भजन व शक्ती नाचाची बारी सादर करीत चांगलीच रंगत आणली. कोकणातील चिपळूण जवळील शिगवण वाडी व घाडगे वाडी येथील भजन व शक्ती नाच मंडळाला नागोठण्यातील भाई टके यांच्याकडून खास आमंत्रित करण्यात आले होते. २२ जणांचा समावेश आलेल्या या मंडळाने दुपारी दोन वाजता भजनाने आपल्या कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी बाप्पांच्या समोर एकाहून एक सरस अशी भजने गाऊन या मंडळाने उपस्थितांना भक्तिमय वातावरणात न्हाऊन टाकले. त्यानंतर थोड्याशा विश्रांती नंतर या मंडळाने आकर्षक अशी वेशभूषा करून कोकणातील गणेशोत्सव काळातील प्रसिद्ध अशा शक्ती तुरा नाचातील शक्तीवाले नाच मंडळ म्हणून गौळण व एकाहून एक सदाबहार गाणी आपल्या आकर्षक नृत्यातून सादर केली.



### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून दहिवली आणि मालेगाव या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. श्री साई ट्रस्टकडून नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील मालेगाव आणि दहिवली येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन वर्षभराचे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी श्री साई ट्रस्टकडून बिंदू हिंगवाला, अर्जुन मेनन, मिनी मेनन, ट्रस्टचे अध्यक्ष गणेश अय्यर, लक्ष्मी अय्यर, राधिका घुले तसेच माणगावतर्फे वरेडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले, संजय थोरात, नरेश कालेकर, गायकवाड, तसेच पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### ‘स्मार्ट शेती’ नाटिकेला दाद

**चिपळूण :** राज्य विज्ञान संस्था, नागपूर यांच्या निर्देशानुसार व माध्यमिक शिक्षण विभाग रत्नागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी जिल्हा विज्ञान शिक्षक मंडळ व चिपळूण विज्ञान शिक्षक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय विज्ञान नाटोत्सव स्पर्धा नुकतीच वालोपे येथील ख्रिस्त ज्योती कॉन्व्हेंट स्कूल येथे पार पडली. या स्पर्धेत सह्याद्री शिक्षण संस्था संचालित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावर्डे या विद्यालयाने उत्कृष्ट कलाकृती सादर करत द्वितीय क्रमांकाचे यश संपादन केले.

मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या व्यापक विषयांतर्गत विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देणे, तसेच आधुनिक शेतीसंबंधी विविध तंत्रज्ञानाची माहिती समाजापर्यंत पोहोचवून जनजागृती करण्याचा उद्देश या सादरीकरणातून साधला गेला. ध्रुविका माने, प्रगती बुदर, सार्थक पारधी, युवराज रसाळ, आराध्या थरवळ, निधी कुंभार, सिद्धी इंगळे व आरोही चव्हाण यांनी या नाटिकेत भूमिका साकारल्या होत्या.

### अपभ्रंश करणाऱ्या पाट्या बदलल्या

**रसायनी :** आधुनिक काळात रस्ते महामार्ग व दळणवळणाच्या साधनांनी गावे, शहरे अधिक जवळ आली आहेत. पर्यटक, प्रवाशी यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी प्रत्येक गावाच्या बाहेर, मुख्य रस्त्यावर शासनामार्फत गावांची नावे, नाव विविध आकारांच्या पाट्या लिहिलेल्या आहेत. गावचे स्थान दाखविणाऱ्या या पाट्या पर्यटक प्रवासी व अनोळखी व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. रसायनीतील मोहोपाडा हे महत्वाची बाजारपेठ असणारे ठिकाण आहे. गावाच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या मोपाडा, मोहपाडा या पाट्या नावांचा अपभ्रंश करणाऱ्या असून अनेक वर्षापासून या पाट्या बदलल्या जात नसल्याने गावांच्या नावाचा उच्चार व लेखन चुकीच्या पद्धतीने केले जात आहे. यातच वासांबे असे कोणतेही गाव नसून मोहोपाडा गावाचीच वासांबे अशी पुर्वीपासून ओळख आहे. यावेळी परगावातून आलेले नागरिक वासांबे गाव शोधताना दिसतात. गावाच्या नावावरून अनोळखी व्यक्तींना, वाटसरू, प्रवाशांना त्याची माहिती लक्षात येते, स्थान समजते. मात्र मोहोपाडा गावाच्या प्रवेशव्दार व थांब्याजवळ असणाऱ्या गावाच्या नावांचे फलक हे चुकीच्या पद्धतीने लिहिलेले असल्याने गाव प्रवेशव्दाराच्या काही ठिकाणी फलक नसल्याने अनेक वर्षापासून मोपाडा, मोहपाडा या गावाच्या नावाचा चुकीचा उच्चार व चुकीचे नामाभिधान केले जाते आहे. तरी ते मोहोपाडा (वासांबे) अशी मोहोपाडा प्रवेशव्दार, बसथांबा येथे अशी मागणी होती.

# वादळी वातावरणामुळे मासेमारी ठप्प



| रायगड | प्रतिनिधी |

गेल्या १५ दिवसांहून अधिक काळ समुद्रातील वातावरण अशांत आहे. ऐन मासेमारी हंगामात निर्माण झालेल्या वादळी वाऱ्यामुळे नौका दोन आठवड्यांपेक्षा जास्त दिवस मासेमारी ठप्प होऊन मच्छिमारांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी मच्छीमार संघटनांनी राज्य सरकारकडे केली आहे.

पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी ३१ जुलैला संपल्यानंतर राज्यातील सात सागरी जिल्ह्यांमधील मच्छिमारांनी १ ऑगस्टपासून समुद्रात मासेमारीला सुरुवात केली; परंतु वादळी वारे व अतिवृष्टीमुळे सर्व मच्छिमारांना पुन्हा किनाऱ्याला परतावे लागले. जवळपास दोन आठवड्यांहून अधिक काळ मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. राज्यात कोकण किनारपट्टीवर सुमारे १८ हजार लहान-मोठ्या नौका असून त्या नौकांवरील डिझेल, बर्फ, खलाशी वेतन, अन्नधान्य, जाळी आदींसाठी एका नौकेला सुमारे दीड लाख रुपये खर्च येतो; मात्र प्रतिकूल हवामानामुळे हा खर्च अक्षरश: वाया गेला आहे. त्याचबरोबर, नौकांवरील कर्जाचे हप्ते, खलाशांचे प्रश्न व इतर दायित्वे आदी बाबीही लक्षात घेणे आवश्यक आहे.

ही भरपाई फक्त नोंदणीकृत व क्रियाशील मच्छिमारांनाच देण्यात यावी, एका नौका मालकाच्या एकापेक्षा जास्त नौका असल्यास त्याला फक्त एका नौकेचीच भरपाई देण्यात यावी, पर्ससीन नेट मासेमारीला केंद्र सरकारने दिलेल्या मर्यादिनुसार बंदी असल्याने त्या प्रकारच्या नौकांना भरपाई देऊ नये, लाभार्थ्यांची शहानिशा करूनच भरपाई थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात यावी, आदी मागण्या केल्या आहेत.

मच्छिमार मेटाकुटीला आला असून कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे. सरकार शेतकऱ्यांना भरपाई देते, त्याचप्रमाणे मच्छिमारांनाही सरकारने मदत द्यावी. दरवर्षी मासेमारी हंगामाची सुरुवात १५ ऑगस्टपासून करावी, अशी मागणी मच्छीमार सातत्याने करीत आहेत; परंतु या मागणीची सरकारकडून दखल घेण्यात येत नसल्याने मच्छिमारांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

### नौकेमागे अडीच लाखांचे अनुदान द्यावे!

**मच्छिमारांना प्रत्येक नौकेमागे अडीच लाख, तसेच नोंदणीकृत मच्छिमारांना प्रत्येकी १५ हजारांची भरपाई देण्याची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. या भरपाईचे नौकेनुसार वर्गीकरण करण्यात यावे, असे मच्छिमारांचे म्हणणे आहे. त्यानुसार सहा सिलिंडरच्या नौकांना २.५० लाख, चार सिलिंडरच्या नौकांना १.७५ लाख, दोन सिलिंडरच्या नौकांना ७५ हजार व एक सिलिंडरच्या नौकांना ४५ हजार रुपये देण्यात यावे, अशी मच्छिमारांची मागणी आहे.**

## कराडे येथे एकाची आत्महत्या

| रसायनी | वार्ताहर |

नोकरी गेल्याने आर्थिक विंवचनेतून आलेल्या नैराश्यामुळे कराडे येथील बेलेंत्रा सोसायटीमधील एका इसमाने आत्महत्या केल्याची घटना घडली. सदर बाबतीत हकिकत अशी की भरत दशरथ सरवणकर (४८) रा. बेलेंत्रा सोसायटी कराडे खुर्द हे नोकरी गेल्याने आर्थिक अडचणीत होते. त्यांना चार वर्षापासून झोप येत नव्हती. त्यामुळे त्रस्त होवून त्यांनी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. सदर प्रकरणी भूमी भरत सरवणकर यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असता आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## ‘ई-केवायसी करून घ्या’

**रोहा :** गणेशोत्सवाच्या निमित्ताने बाहेरगावी असलेले गणेशभक्त, मोठ्या प्रमाणात येत असतात. महसूल खात्याकडून रोहा तहसील कार्यालयामार्फत शेतकरी जनता, ग्रामस्थ यांना वेळोवेळी राज्य केंद्र शासनाकडून जाहीर होत असलेल्या विविध योजना त्यामध्ये नैसर्गिक अतिवृष्टी, नुकसान भरपाई मंजूर होत असते. त्यामुळे गावी येणाऱ्या नागरिकांनी ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करून घ्याव्यात. त्यासाठी गावागावात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी लाभार्थी तसेच योजनेस पात्र असलेल्या नागरिकांनी ई-केवायसी पूर्तता करून घ्यावे असे आवाहन तहसीलदार डॉ.किशोर देशमुख यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वेश्वी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) श्री. गौरांग प्रविण शहा व (२) श्री. प्रविण पितांबरदास शहा, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र | क्षेत्र(आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वेश्वी | १/४/२ | २-८५-०० | २८.५०/- |

सदरहू वर्णन केलली बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०१/०९/२०२५ सही/-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग,
जि. रायगड ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी, शिवाजी चौक, ता. अलिबाग,
जि. रायगड मोबाईल नं. : ९८५०४०२०५०


## आसन व्यवस्थेसाठी दिले निवेदन

रोहा : राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष तुषार विठ्ठल खरीवले यांनी रोहा स्टेशन मास्तर यांची भेट घेऊन रेल्वे प्रवाशांच्या अनेक समस्यांबाबत चर्चा केली. व नागोठणे मार्गावरील निडी रेल्वे स्टेशनमध्ये प्रवाशांसाठी आसनची व्यवस्था करण्याची मागणी करत निवेदन देण्यात आले. शेकडो प्रवासीवर्ग रेल्वेतून प्रवासाकरीता येत असतात. निडी रेल्वे स्टेशनवर कोणत्याही प्रकारची बसण्याची व्यवस्था नसल्याने सर्वांचे प्रचंड हाल होत आहेत व आजारी लोकांना बसण्याकरीता मिळत नसल्यामुळे त्यांना सुध्दा अनेक अडचणीना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे निडी रेल्वे स्टेशनवर आसन व्यवस्था करणे अत्यंत जरूरीचे आहे. १५ दिवसामध्ये आसन व्यवस्था न केल्यास राष्ट्रवादी जनआंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

## शिवरायांचे विचार आजही ऊर्जा देणारे

### स्नेहल जगताप यांचे मत



| महाड | वार्ताहर |

आराध्य दैवत शिवछत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व आदर्श डोळ्यासमोर ठेवत विचार घेऊन आपण पुढे जात असताना एक वेगळीच ऊर्जा प्राप्त होत असल्याचे मत स्नेहल जगताप यांनी वहूर मावळती वाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण प्रसंगी मत व्यक्त केले

वहूर गावात ऐतिहासिक सोहळा गणपती उत्सव दरम्यान मोठ्या दिमाख्यात २९ ऑगस्ट रोजी संपन्न झाला या वेळी स्नेहल जगताप हनुमंत जगताप, धनंजय देशमुख, राजुशेठ कोरपे, रिहान देशमुख, अश्विनी घरटकर सोमनाथ ओझर्डे, किरीट पेंढारी, सदानंद मांडवकर, जितेंद्र बैकर, मन्सूर ताज, नामदेव पवार, रामदास मांडवकर, जग्गनाथ सावंत, बाबू पटेल, नदीमभाई इसाने, शिवनेरी मित्र मंडळ, मुंबई वहूर, गावदेवी महिला मंडळ, गावदेवी क्रिकेट क्लब आदी उपस्थित होते

या वेळी बोलताना जगताप यांनी शिवरायांची ही प्रेरणा सदैव आपल्याला मार्गदर्शित करत असल्याचं सांगत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी बारा बलुतेदार व अठरापगड जातींना सोबत घेत स्वराज्याची निर्मिती केली होती त्यालाच अनुसरून संपूर्ण देशात ही वाटचाल सुरू. या तालुक्यात दिसून येत आहे. वहूर गावात याची प्रचिती येत असल्याचे सांगत किल्ले रायगडच्या धरतीवरती वहूर गावात सुंदर अशी छत्रपती शिवाजी महाराज मूर्ती स्थापन करण्यात आली व या पुतळ्यावरचे अनावर हेच आपल्यासाठी प्रेरणा देणारे ऊर्जा देणारे ठरले आहे

वहूर गाव व जगताप याचे जिव्हाळाचे नाते आहे स्व आबा व गावातील ग्रामस्थांचे कार्याचा उल्लेख स्नेहल यांनी आपल्या भाषणात केला व ग्रामस्थांचे आभार मानत गावातील नागरिकांनी या परिसराला छत्रपती शिवाजी महाराज चौक असे संबोधले गेले हे आपल्या सर्वांसाठी ऊर्जा देणारे आहे.

## संतोष शिंगाडे यांचा सन्मान



| रसायनी | वार्ताहर|

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील सारसई या दुर्गम भागातील संतोष रामा शिंगाडे यांच्या सामाजिक कार्यांचा ठिकठिकाणी गौरव होताना दिसत आहे. रायगड जिल्हा मध्यवर्ती बॅंकेच्यावतीने त्यांना बॅंकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्याहस्ते शानदार कार्यक्रमात गौरविण्यात आले.

संतोष शिंगाडे गेले अनेक वर्ष ग्रामीण भागातील वंचित वाड्या वस्त्यांच्या विकासाठी सातत्याने अग्रसर असून गेली १५ वर्ष समाज कार्यासाठी स्वता:ला झोकून दिले आहे. त्यांनी विविध सेवाभावी संस्था यांच्याशी संपर्क करून ५०० हुन अधिक ग्रामीण व दुर्गम भागातील मुलांना शाळेच्या शैक्षणिक प्रवाहत आणण्यांसाठी शैक्षणिक साहित्य, शाळेला वाढीव खोल्या, शौचालय, दुर्गम भागातून कित्येक किमी पायपीट करुन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ५० पेक्षा अधिक सायकल मिळवून देण्यासाठी तसेच गणेशोत्सव,दिपावली सणांना फराळाची व्यवस्था व्हावी, यासाठी संतोष शिंगाडे यांचे महत्वाचे योगदान असते. गावाच्या विकासाठी ते सातत्यांने सकारात्मक भूमिका घेत असून त्यांच्यामुळे या परिसराचा विकास होत असल्याचे आदिवासी ठाकूर, धनगर समाज बांधवांत बोलले जाते. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकने नुकताच ६५०० कोटींचा व्यवसायिक टप्पा पार केला असून, तसेच राज्यातील सहकार क्षेत्रातील सर्वोच्च सहकार महर्षी पुरस्काराने बॅंकला सन्मानित केले.


### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक: 01.09.2025**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे.

**अनु क्रमांक 1. कामाचे नाव** - एसएसई/माणगाव सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-42, अंदाजित खर्च:** ₹ 15,14,809/-, **ईएमडी** - ₹ 30,300/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 2. कामाचे नाव** - एसएसई/चिपळूण सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-44, अंदाजित खर्च:** ₹ 12,58,382/-, **ईएमडी** - ₹ 25,200/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 3. कामाचे नाव** - एसएसई/रत्नागिरी सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-45, अंदाजित खर्च:** ₹ 13,78,890/-, **ईएमडी** - ₹ 27,600/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 4. कामाचे नाव** - एसएसई/विलवडे सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-41, अंदाजित खर्च:** ₹ 13,47,261/-, **ईएमडी** - ₹ 27,000/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)


## उरणच्या बाह्यवळणाचा मार्ग सुकर

| उरण | वार्ताहर |

शहरातील वाहतूक कोंडीवर महत्वपूर्ण उपाय असलेल्या उरण बाह्यवळण (बायपास)मार्गात नगरपरिषद हद्दीतील जमिनीचे भूसंपादन व पुनर्वसनासाठी लागणारा १२ कोटी रुपयांचा निधी लवकरच उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यात हा बहुप्रतिक्षित मार्ग सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे.

उरणच्या सर्व मार्गावर सततच्या कोंडीने प्रवासी, नागरिक आणि वाहन चालक त्रस्त झाले आहेत. हा मार्ग लवकरात लवकर पूर्ण करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे. उरण बाह्यवळण मार्गाचा प्रस्ताव २००१ साली पहिल्या युती सरकारच्या काळात उरण शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून शहराला जोडणाऱ्या उरण , पनवेल या मुख्य मार्गालगत मोरा मार्गाला जोडणारा बाह्यवळण मार्ग प्रस्तावित होता.

या मार्गात कांदळवन असल्याने त्यांच्या परवानग्या मिळण्यासाठी अनेक वर्षे लागली. त्यामुळे या मार्गाच्या खर्चात वाढ झाली. आज ४५ कोटींच्या घरात या बाह्यवळण मार्गाचा खर्च गेला आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक जमिनीसाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावी यासाठी प्रयत्न करीत आहेत. मात्र सध्या सिडकोच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या या मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. मात्र या मार्गाला जोडणाऱ्या उरण नगर परिषदेच्या हद्दीतील भूखंडावर घरे आहेत. त्यासाठी पनवेलच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडून येथील जमिनीच्या अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू आहे. मात्र त्यासाठी लागणारा निधी मिळावा याकरिता शासन दरबारी प्रयत्न सुरू आहेत.

जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे.या भूखंडावर काही कुळांची घरे आहेत. यासाठी निधी उपलब्ध झाल्यानंतर या मार्गाचे काम पूर्ण होईल असा विश्वास उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली आहे.

## भाकरवड गावात कविसंमेलन साजरे

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे नरेश पाटील यांच्या निवासस्थानी कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण यांच्या विद्यमाने घेण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात गणेश पूजन करून, श्रीफळ वाढवून त्यानंतर गणेशाला वंदन करून करण्यात आली कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, गणेश कोळी, प्राध्यापक एल. बी. पाटील, जगन्नाथ राऊत, उरण शाखा अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, अनिल भोईर, के.पा. म्हात्रे, अजय शिवकर, मोहन पाटील, अनुज शिवकर, महेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की :-

आमचे अशिल यांना खालील नमूद केलेली फ्लॅट मिळकत त्यांचे विदेमान मालकांकडून खरेदी करावयाची आहे. ते येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

मौज भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत सर्व्हे नं. २९अ, ३०ब व सिटी सर्व्हे नं. ५७५, ५८७, ५८८, ५८९, ५९०, ५९१, ५९२, ५९३, ५९४, ५९६, ५९७,५९८, २२९ यावरील स्वप्नदिप सहकारी गृहनिर्माण सोसायटी या इमारतीमधील बि विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०५ क्षेत्र ४१५ चौ. फुट बिल्टअप, कर्जत नगरपरिषद जुना मालमत्ता क्र. Z1001102 नविन मालमत्ता क्र. KARJ0001737 सदनिका क्र. ३३५/२८.
(मालक सौ. जयश्री विनायक मावकर )

वरील मिळकती संदर्भात कोणत्याही ही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचे गहाण, बक्षीसपत्र, फरोक्त, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, मृत्युपत्र इत्यादी प्रकारचे कोणतेही करार केलेले असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर पाठवावी.

वरील मुदतीनंतर आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध व हक्कसंबंध विरहित आहे व त्यावर कोणाचाही काही बोजा, हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो आमचे अशिलाचे लाभात सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागावून आलेली हरकत आमचे अशिल विचारात घेणार नाही.

दिनांक ३१/०८/२०२५
**ॲड. स्वप्निल दिपक राजमाने**
रा. स्वप्नदिप अपार्टमेंट, डेक्कन जिमखाना,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो. नं. ९९४६८८७६७३


## आरोग्य कर्मचाऱ्यांचा संप सुरूच

| नवीन पनवेल | वार्ताहर |

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांचा संप अलिबाग येथे १२ व्या दिवशीही सुरू आहे. शासनासोबत दोन वेळा बैठक झाली परंतु त्यावर तोडगा निघाला नाही. या संपात पनवेलमधून २ आणि रायगडमधील ९ असे कुष्ठरोग निर्मूलनमधील ११ कर्मचारी सहभागी झाले आहेत.

विविध मागण्यासाठी रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील ६०० हुन अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांनी १९ तारखेपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. यामुळे सरकारी रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेसह अतिदक्षता विभाग, लसीकरण औषध वितरण यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती अंतर्गत विविध आरोग्य कामगार संघटना प्रथमच यामध्ये सक्रिय झाल्या आहेत. यामध्ये अधिकारी आणि कर्मचारी यांचा सहभाग असल्याने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होणार आहे. हे सर्व सरकारी रुग्णालयात आरोग्य विभागाच्या नियमित सेवेत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्याबरोबर खांद्याला खांदा लावून काम करतात. परंतु त्यांना पगार कमी मिळतो १० वर्षापेक्षा अधिक काळ सेवेत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ७० संवर्ग आहेत. शासनाच्या २०२४ मध्ये सहसा निर्णय जारी करून त्यांना सरकारी सेवेत संयोजन करण्याचा निर्णय घेतला होता.

## माजी नौसैनिक आले एकत्र



| नेरळ | प्रतिनिधी |

भारतीय नौदलाच्या १९९४ बॅचचे सेवानिवृत्त नौसैनिक हे तब्बल २५ वर्षांनी पुन्हा एकत्र आले.भारतीय नौदलाच्या २/९४ बॅचच्या सेवानिवृत्त सैनिकांचे गेट टुगेदर नेरळ कर्जत रस्त्यावरील सीमा रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आले होते.

२००० सालापर्यंत भारतीय लष्करी सेवेत सेवा बजावणारे ही सर्व माजी सैनिक आपल्या मित्रांना भेटण्यासाठी २५ वर्षांनी एकत्र आले. आपल्या जुन्या सहकाऱ्यांशी पुन्हा भेट घेऊन अनेक भावनिक क्षण सामायिक केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजक समिती मध्ये ॲड. रमाकांत तरे, धनंजय करगुटकर, जगदीश जाधव, मोहम्मद हाफिज मिया, कादरी आणि सहकारी होते. गेट टुगेदरने भारतीय नौदलाच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून दिली.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीन मालक श्री. किशोर जनार्दन पाटील आणि जयश्री सदानंद पोखरकर, यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. /उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ७१/२/अ | २-१९-१० | ०-०९-०० | २-२८-०० | १.३७ |
| पैकी मुळ जमिन मालक यांच्या मालकी हक्कातील पश्चिम दिशेकडील विक्रीयोग्य क्षेत्र | | | ०-३१-०० | |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे. त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबध, दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदर जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने पुढील कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

**सही : धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
मो. नं. ९६१९५०५९५८


## वाहतूक कोंडीत अडकली रुग्णवाहिका

### गरोदर महिलेचे हाल



| उरण | वार्ताहर |

चिर्ले-दिघोडे, गव्हाण फाटा-पाडेघर तसेच खोपटा पुल ते धुतूम वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यास मात्र वेळ मिळत नसल्याचे वास्तव आहे. दररोज हजारो वाहनचालकांना या रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या त्रासाला सामोरे जावे लागत असताना शनिवारी रात्री गरोदर महिलेला रुग्णालयात घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला या वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे.

शनिवारी एका गरोदर महिलेला रुग्णालयात पुढील उपचारासाठी घेऊन जाणारी एक रुग्णवाहिका चक्क रात्री दिघोडे - चिर्ले रस्त्यावर वाहतूक कोंडीत अडकून पडल्याची घटना घडली. उरण तालुक्याचे तहसीलदार डॉ उध्दव कदम, गटविकास अधिकारी, पोलीस यंत्रणा विशेष करून लोकप्रतिनिधी यांनी या घटनेवर ठोस उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी करण्यात येत आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-13/25-26 7000037280 | Annual Maintenance contract for routine maintenance of Nitrogen injection fire protection system (NIFPS) including replacement of faulty spares at various substation under Panvel circle. For F.Y. 2025-2026 & 2026 -2027 **Tender Fee Rs. 500/- + GST.** | Limited to Rs. 25.00 Lakhs |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 29.08.2025 to 15.09.2025 up to 11:00 hrs, Opening date: 15.09.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**Superintending Engineer,
EHV (O&M) Circle, Panvel**

# निवडक

## हरमनप्रीत सिंगची हॅट्ट्रिक



**नवी दिल्ली :** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्म दिनी देशभरात क्रीडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बिहारच्या राजगीरच्या मैदानात भारत – चीन यांच्यातील लढतीसह हॉकीतील आशिया कप स्पर्धेला सुरुवात झाली. हमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सलामीच्या लढतीत ४–३ असा विजय नोंदवत प्रतिष्ठित स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारतीय हॉकी संघाने अ गटात चीन विरुद्धच्या लढतीनं आशिया कप स्पर्धेतील यंदाच्या हंगामाची सुरुवात केली. या सामन्यात पहिला गोल हा चीनच्या संघाने डागला. पहिल्या क्वार्टरमध्ये १–० अशी आघाडी घेतल्यावर भारतीय संघाने फार वेळ न घालवता १–१ असा बरोबरीचा डाव साधला. त्यानंतर भारतीय संघाने आक्रमक अंदाजात खेळ दाखवत आघाडी ३–१ अशी केली. भारतीय संघाचा कर्णधार हरमनप्रीतन तीन गोल डागले. चीनच्या संघाने अखेरच्या क्वॉर्टरपर्यंत विजयासी आस टिकवली. पण शेवटी भारतीय संघाने ४–३ अशा फरकासही सामना जिंकला.तिसऱ्या क्वॉर्टरमध्ये भारत–चीन दोन्ही संघाच्या खात्यात प्रत्येकी ३–३ गोल जमा झाले होते. अखेरच्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंहनं ४७ व्या मिनिटांत पेनल्टी कॉर्नरची संधी गोलमध्ये रुपांतरित करत भारताला ४–३ अशी आघाडी मिळवून दिली. हा गोल भारतीय संघाचा विजय निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरला.

## चार चेंडूत चार विकेट्स

**नवी दिल्ली :** देशांतर्गत क्रिकेटमधील दुलीप करंडक स्पर्धेत अनेक स्टार क्रिकेटर आपल्यातील धमक दाखवण्यासाठी



मैदानात उतरले आहेत. एका बाजूला शमी आणि अर्शदीप सिंह यासारखे गोलंदाज ज्या सामन्यात आपली छाप सोडायला कमी पडले तिथं अनकॅप्ड गोलंदाजाने पंजा मारत खास विक्रमी डाव साधला आहे. एक नजर दुलीप करंडक स्पर्धेतील गोलंदाजीत सेट झालेल्या जम्मू काश्मीरच्या औकिब नबीनं विक्रमी चौकारासह मारला पंजा दुलीप करंडक स्पर्धेत उत्तर विभाग संघाकडून मैदानात उतरलेल्या जम्मूच्या औकिब नबी याने पूर्व विभाग संघाविरुद्ध पाच विकेट्सचा डाव साधला. ही कामगिरी करताना त्याने चार चेंडूत चार विकेट्स घेत इतिहास रचला आहे. दुलीप करंडक स्पर्धेत अशी कामगिरी करणारा तो पहिला गोलंदाज ठरला आहे. याशिवाय भारतीय क्रिकेटचा विचार करता चार चेंडूत चार विकेट्स घेणारा तो चौथा गोलंदाज ठरला. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात १९८८–८९ च्या रणजी हंगामात दिल्लीच्या संघाकडून शंकर सैनी याने पहिल्यांदाच सलग चार चेंडूत चार विकेट्स घेण्याचा पराक्रम करून दाखवला होता. हिमाचल प्रदेश विरुद्ध त्याने ही विक्रमी कामगिरी नोंदवली होती.

## फुटबॉलचा सुवर्णकाळ संपणार

**नवी दिल्ली :** मागील काही दिवसात अनेक दिग्गज खेळाडू



निवृत्ती जाहीर करताना दिसले. क्रिकेटपटूनंतर आता फ ुटबॉलपटूही निवृत्तीची घोषणा करण्यासाठी सज्ज झाले आहेत. लियोनेल मेस्सी निवृत्ती जाहीर करण्याच्या तयारीत असल्याचे म्हटले जात आहे. फुटबॉलचा जादूगार लियोनेल मेस्सीने असे विधान केले आहे ज्यामुळे त्याच्या लाखो चाहत्यांच्या हृदयाचे ठोके वाढले आहेत. ३८ वर्षीय अर्जेंटिनाच्या स्टारने स्पष्ट केले आहे की त्याची आंतरराष्ट्रीय कारकीर्द आता संपणार आहे. मेस्सीने संकेत दिले आहेत की, ४ सप्टेंबर रोजी ब्यूनस आयर्समधील एस्टाडिओ मोन्युमेंटल स्टेडियमवर व्हेनेझुएलाविरुद्धचा विश्वचषक पात्रता सामना हा त्याचा शेवटचा घरचा सामना असू शकतो.मुलाखतीत मेस्सी म्हणाला, हा माझ्यासाठी खूप खास सामना असेल. हा माझा शेवटचा क्वालिफायर सामना असू शकतो. यानंतर कोणतेही मैत्रीपूर्ण किंवा इतर सामने होतील की नाही हे मला माहित नाही. अर्जेंटिना २०२६ च्या विश्वचषकासाठी आधीच पात्र ठरला आहे. दक्षिण अमेरिकन पात्रता यादीत ३५ गुणांसह संघ अव्वल स्थानावर आहे. अशा परिस्थितीत, हा सामना अर्जेंटिनासाठी फक्त एक औपचारिकता आहे, परंतु मेस्सी आणि त्याच्या चाहत्यांसाठी हा एक अतिशय भावनिक क्षण ठरणार आहे. आतापर्यंत मेस्सीने १९३ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

# आशिया कपच्या वेळापत्रकात बदल

## ९ ते २८ सप्टेंबरदरम्यान खेळली जाणार स्पर्धा | आठ संघांचा असणार समावेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया कप २०२५ स्पर्धा सुरु होण्यासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. ९ ते २८ सप्टेंबर पासून आशिया कपचे सामने दुबई आणि अबुदाबी येथे खेळवले जाणार आहेत. काही दिवसांपूर्वीच या स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. मात्र स्पर्धा सुरु होण्यासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक असताना वेळापत्रकात बदल करण्यात आलेला आहे. त्यामुळे आशिया कपचे सामने पाहण्यासाठी उत्सुक असलेल्या फॅन्स करता ही माहिती अत्यंत महत्वाची आहे.

आशिया कप २०२५ चे सामने भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता सुरु होणार आहेत. सुरुवातीला हे सामने संध्याकाळी ७: ३० वाजता सुरु होणार होते, परंतु आता यूएईमधील हवामान हे गरम असल्याने परिस्थिती लक्षात घेऊन सामन्यांच्या वेळेमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. वेळेत बदल करण्यासाठी ब्रॉडकास्टरना विनंती करण्यात आली होती, ही विनंती स्वीकारण्यात आली आहे.

आशिया कप २०२५ मध्ये यंदा आठ संघांचा समावेश असणार आहे. या आठ संघांना दोन गटात विभागण्यात आलं असून ग्रुप एमध्ये भारत, पाकिस्तान, यूएई, ओमन तर ग्रुप बी–बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग यांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील अव्वल संघ पुढील फेरीत प्रवेश करतील, आणि अंतिम सामना २८ सप्टेंबर २०२५ रोजी होईल.

भारत आणि पाकिस्तान ग्रुपमध्ये एकत्र आहेत, त्यामुळे ते १४ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रुप स्टेजमध्ये भिडतील. जर दोन्ही संघ सुपर फोर आणि अंतिम सामन्यासाठी पात्र ठरले, तर ते एकूण तीन वेळा एकमेकांविरुद्ध खेळू शकतात.

भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होणार होते, उष्ण हवामानामुळे सामन्यांची वेळ बदलून रात्री ८:०० वाजता करण्यात आली आहे. ब्रॉडकास्टर यांनी ही विनंती स्वीकारली आहे.




### भारतीय संघाचे सामने

**यंदा आशिया कप टी२० फॉर्मेटमध्ये खेळवला जाणार असून यात भारताचा पहिला सामना हा १० सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमीरात विरुद्ध होईल. तर दुसरा सामना हा १४ सप्टेंबर रोजी पाकिस्तान विरुद्ध होईल. भारताचा तिसरा ग्रुप स्टेज सामना हा १९ सप्टेंबर रोजी ओमान विरुद्ध होईल.**

### भारतीय संघ :

**सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (विकेटकीपर), जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन (विकेटकीपर), हर्षित राणा आणि रिंकू सिंह.**

**स्टॅण्डबाय खेळाडू : यशस्वी जायसवाल, वॉशिंगटन सुंदर, प्रसिद्धकृष्णा, ध्रुव जुरेल, रियान पराग**

## सॅफ नेशन्स चषक फुटबॉल स्पर्धेत

# भारताची विजयी सलामी

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**



नवे प्रशिक्षक खालिद जमील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय पुरुष फुटबॉल संघाने सॅफ नेशन्स चषक फुटबॉल स्पर्धेत शनिवारी आपल्या पहिल्याच सामन्यात शानदार विजय नोंदवला आहे. सलामीच्या सामन्यात भारताने यजमान आणि क्रमवारीत वरचढ असलेल्या तझाकिस्तानचा त्यांच्याच भूमीवर २–१ अशा गोल फरकाने पराभव केला. भारताकडून अन्वर अली आणि संदेश झिंगन यांनी गोल केले, तर गुरप्रीत सिंग संधूने एक महत्त्वपूर्ण पेनल्टी वाचवत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. जवळपास दोन वर्षांनंतर परदेशी भूमीवर भारताचा हा पहिलाच विजय आहे. यापूर्वी नोव्हेंबर २०२३ मध्ये विश्वचषक पात्रता फेरीत भारताने कुवेतला हरवले होते. सेंट्रल हिसोर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. सामन्याच्या पाचव्या मिनिटालाच बचावपटू अन्वर अलीने हेडरद्वारे गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अन्वर अलीच्या क्रॉसवर राहुल भेकेने मारलेला हेडर तझाकिस्तानच्या गोलरक्षकाने अडवला, मात्र परतीच्या चेंडूवर संदेश झिंगनने गोल करत भारताची आघाडी २–० अशी मजबूत केली. यजमान संघाकडून शाहरोम समिएवने एक गोल करत सामन्यात रंगत आणली. दुसर्या सत्रात विक्रम प्रताप सिंगच्या चुकीमुळे तझाकिस्तानला पेनल्टी मिळाली, पण भारताचा अनुभवी गोलरक्षक गुरप्रीत सिंग संधूने अप्रतिम बचाव करत संघाची आघाडी कायम राखली. सुनील छेत्री आणि मोहन बगान या खेळाडूंच्या अनुपस्थितीतही संघाने ही दमदार कामगिरी केली. या विजयामुळे भारताने स्पर्धेत विजयी सुरुवात केली असून, आता भारताचा पुढील सामना सोमवारी (१ सप्टेंबर) बलाढ्य इराणशी होणार आहे.

## द्रविडचा प्रशिक्षकपदावरून पायउतार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ हंगामापूर्वी राजस्थान रॉयल्स संघात मोठी उलथापालथ झाली आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि भारतीय क्रिकेटची द वॉल म्हणून ओळखले जाणारे राहुल द्रविड यांनी आपल्या पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, द्रविड यांनी फ्रँचायझीने देऊ केलेली वरिष्ठ पदाची ऑफर नाकारली आहे. द्रविड यांच्या राजीनाम्याच्या वृत्ताने खळबळ उडाली. राजस्थान रॉयल्सने शनिवारी ही घोषणा केली. निवेदनात म्हटले आहे की, राहुल अनेक वर्षांपासून रॉयल्सच्या प्रवासाचा केंद्रबिंदू राहिला आहे. त्यांच्या नेतृत्वाने खेळाडूंच्या एका पिढीला प्रभावित केले, संघात मजबूत मूल्ये रुजवली आणि फ्रँचायझीच्या संस्कृतीवर एक अमिट छाप सोडली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, फ्रँचायझीच्या पुनर्रचनेचा भाग म्हणून राहुलला संघात अधिक व्यापक भूमिकेची ऑफर देण्यात आली होती; परंतु त्यांनी ती न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. राजस्थान रॉयल्स, त्यांचे खेळाडू आणि जगभरातील लाखो चाहते राहुल द्रविड यांचे फ्रँचायझीसाठी दिलेल्या उल्लेखनीय सेवेबद्दल मनःपूर्वक आभार मानत आहेत. द्रविड यांना २०२५ च्या हंगामापूर्वी संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले होते. मात्र, आता त्यांच्या जाण्याने संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आयपीएलच्या मिनी लिलावाला काही महिने शिल्लक असताना जर संघाचा मुख्य प्रशिक्षक आणि कर्णधार दोघेही संघाबाहेर गेले, तर राजस्थान रॉयल्ससाठी ही एक अत्यंत अवघड परिस्थिती असेल.

## बीसीसीआयला सरकारचा दणका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत सरकारने ऑनलाइन गेमिंग कायदा लागू झाल्यानंतर पैशांच्या आधारावर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन गेम्सवर बंदी घातली. याचा थेट परिणाम फॅन्टसी गेमिंग क्षेत्रातील प्रमुख कंपनी ड्रीम११ वर झाला असून, कंपनीने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला कळवले आहे की ते आता भारतीय संघाचे स्पॉन्सर राहू शकणार नाही. ड्रीम११ च्या माघारीमुळे बोर्डाला तब्बल ११९ कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. ड्रीम ११च्या प्रतिनिधींनी बीसीसीआय कार्यालयाला भेट दिली आणि सीईओ हेमांग अमीन यांना पुढे स्पॉन्सरशिप सुरू ठेवता येणार नसल्याची माहिती दिली. परिणामी, आशिया कपसाठी स्पॉन्सर राहणार नाहीत.

# सिंधूचे पदकाचे स्वप्न भंगले

- **विक्रमी सहा पदक जिंकण्यावर होते लक्ष्य**
- **मिश्र दुहेरीतील विजयाचे आव्हान संपुष्टात**

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**



दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधूचे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहावे पदक जिंकण्याचे स्वप्न शुक्रवारी भंगले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या तीन गेमच्या थरारक लढतीत तिला इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वर्दानीकडून पराभव पत्करावा लागला. या पराभवासह स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात आले.

२०१९ सालची विश्वविजेती आणि या स्पर्धेत एकूण पाच पदके नावावर असलेल्या सिंधूचे लक्ष्य विक्रमी सहाव्या पदकावर होते. मात्र, ६४ मिनिटे चाललेल्या या अटीतटीच्या सामन्यात नवव्या मानांकित वर्दानीने सिंधूचा १४–२१, २१–१३, १६–२१ असा पराभव केला.

तत्पूर्वी, भारताच्या मिश्र दुहेरीतील ध्रुव कपिला आणि तनिशा क्रास्टो या जोडीचे आव्हानही संपुष्टात आले. त्यांना मलेशियाच्या चेन तांग जी आणि तोह ई वेई या जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानी असलेल्या जोडीकडून १५–२१, १३–२१ असा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला. यामुळे भारताचे या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत मिश्र दुहेरीतील पहिले पदक मिळवण्याचे स्वप्न अधुरे राहिले. सिंधूची ऐतिहासिक कामगिरी आणि सध्याचा संघर्ष हैदराबादच्या ३० वर्षीय सिंधूने २०१३ मध्ये ग्वांगझू येथे आपले पहिले जागतिक पदक जिंकले होते. त्यानंतर तिने आपल्या कामगिरीत सातत्य राखत अनेक ऐतिहासिक टप्पे गाठले. ऑलिम्पिकमध्ये सलग दोन पदके (२०१६ रिओ रौप्य, २०२० टोकियो कांस्य) जिंकणारी सिंधू एकमेव भारतीय महिला खेळाडू आहे. मात्र, २०२२ मध्ये राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्यापासून तिच्यासाठी काळ खडतर राहिला आहे.

## पाकिस्तानचा संघ येणार भारतात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा संघ भारतात होणाऱ्या ज्युनियर वर्ल्डकप हॉकी स्पर्धेत सहभागी होणार आहे. पाकिस्तानने आशिया कपमधून माघार घेतल्यानंतर त्यांच्या सहभागाबाबत शंका होती, परंतु आता त्यांनी भारतात येण्याची खात्री दिली आहे. सरकारने त्यांच्या व्हिसालाही मंजुरी दिली आहे. या वर्षाअखेरीस भारतात होणाऱ्या ज्युनियर विश्वकरंडक हॉकी स्पर्धेत खेळण्यास येणार असल्याची माहिती हॉकी इंडियाचे भोलानाथ सिंग यांनी शनिवारी (दि.३०) ऑगस्ट रोजी दिली. चेन्नई व मदुराई येथे नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये होणाऱ्या ज्युनिअर विश्वकरंडक स्पर्धेत पाकिस्तान खेळेल का, याबाबत शंका निर्माण झाली होती.

## पदकविजेत्यांच्या गौरवाने क्रीडा दिन साजरा

**। पुणे । प्रतिनिधी ।**



आंतरराष्ट्रीयसह राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ३३१ पदकविजेत्यांना रोख पारितोषिकाने गौरवित करून पुण्यात जल्लोषात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. खेलो इंडियासह आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी ५८ कोटीचा अतिरिक्त निधी मंजुर करून रोख बक्षिसे ही खेळाडूंना कष्टाला दिलेली दाद असल्याचे प्रतिपादन पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते रोख पारितोषिकाने १३ आंतरराष्ट्रीय, ३१८ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटरच्या लोगोचे अनावरण पवार व क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आमदार बाबाजी काळे, क्रीडा आयुक्त शीतल तेली–उगले, सहसंचालक सुधीर मोरे, नामदेव शिरगांवकर, संजय शेटे आदी म ान्यवर उपस्थित होते.

सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे व्दिशतक झळकावून महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी केली असे सांगून उपमुख्यमंत्री अजीत पवार पुढे म्हणाला की, महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेच्या वतीने खेळाडूंचे कौतुक होत आहे. रोख पारितोषिके ही त्यांच्या कष्टाला, योगदानाला दिलेली दाद आहे.

## डायमंड लीगमध्ये नीरज उपविजेता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**




भारताचा स्टार भालाफेकपटू आणि ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा याचे डायमंड लीग फायनलचे विजेतेपद पटकावण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे. सलग तिसऱ्या वर्षी अंतिम फेरीत पोहोचलेल्या नीरजला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. जर्मनीच्या ज्युलियन वेबरने ९१.५१ मीटरच्या आपल्या सर्वोत्तम थ्रोसह विजेतेपदावर नाव कोरले, तर नीरजला ८५.०१ मीटरच्या कामगिरीसह रौप्यपदक मिळाले. नीरजने २०२२ मध्ये डायमंड लीगची ट्रॉफी जिंकली होती, मात्र २०२३ आणि त्यानंतर यंदाही त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आहे..या हंगामात नीरजची कामगिरी चांगली राहिली होती. डायमंड लीगच्या चारपैकी दोन पात्रता फेऱ्यांमध्ये भाग घेऊनही तो चौथ्या स्थानी राहत अंतिम फेरीसाठी पात्र ठरला होता. याच हंगामात त्याने ९० मीटरचा टप्पाही ओलांडला होता, जो त्याच्यासाठी एक मोठे आव्हान बनला होता. मे महिन्यात दोहा येथे झालेल्या स्पर्धेत त्याने ९०.२३ मीटर भालाफेक केली होती. त्यानंतर जूनमध्ये पॅरिस येथे झालेल्या स्पर्धेत ८८.१६ मीटरच्या कामगिरीसह त्याने विजेतेपद पटकावले होते. जर्मनीच्या ज्युलियन वेबरने पहिल्याच प्रयत्नात ९१.३७ मीटर भाला फेकून नीरजवर प्रचंड दडपण आणले. याउलट, नीरजने पहिल्या प्रयत्नात ८४.३५ मीटर भाला फेकला आणि तो तिसऱ्या स्थानावर होता.

## भारताच्या प्रस्तावाला मंजुरी | स्पर्धेसाठी ‘आदर्श’ यजमान शहर

# अहमदाबादमध्ये भरणार क्रीडा महाकुंभ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या क्रीडा क्षेत्रातील महत्त्वाकांक्षेला मोठे बळ केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवार (दि.२७) ऑगस्ट रोजी २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या यजमानपदासाठी भारताच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. जागतिक दर्जाची मैदाने, अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा आणि क्रीडाप्रेमी संस्कृतीमुळे अहमदाबाद हे या स्पर्धेसाठी आदर्श यजमान शहर असल्याचेही मंत्रिमंडळाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे भारताचा यजमानपदाचा दावा अधिकृत झाला असून, भारतीय ऑलिम्पिक संघटनेने मार्च महिन्यात स्वारस्य पत्र सादर केल्यानंतर आता औपचारिक प्रस्ताव




सादर करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पत्र सूचना कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळ आणि क्रीडा मंत्रालयाच्या २०३० राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या प्रस्तावात केवळ यजमानपदाचा समावेश नसून, त्यासंबंधीच्या इतर महत्त्वाच्या बाबींनाही मान्यता देण्यात आली आहे.

यजमानपदाचा प्रस्ताव स्वीकारल्यास, यजमान सहयोग करारावर स्वाक्षरी करण्यास, संबंधित मंत्रालये आणि विभागांकडून आवश्यक हमी देण्यास आणि गुजरात सरकारला आवश्यक अनुदान मंजूर करण्यासही मान्यता देण्यात आली आहे, असेही या पत्रकात नमूद केले आहे. या स्पर्धेसाठी प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट असून, भारतीय ऑलिम्पिक संघटना पुढील ४८ तासांत ही औपचारिकता पूर्ण करण्याची शक्यता आहे.

अहमदाबाद हे जागतिक दर्जाची मैदाने, अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा असलेले एक आदर्श यजमान शहर आहे. जगातील सर्वात मोठे स्टेडियम असलेल्या नरेंद्र मोदी स्टेडियमने २०२३ च्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक अंतिम सामन्याचे यशस्वी आयोजन करून आपली क्षमता सिद्ध केली आहे.

### ऑलिम्पिकची पूर्वतयारी

**भारत २०३६ च्या ऑलिम्पिक खेळांचे आयोजन करण्यासही उत्सुक असून, त्यासाठीही अहमदाबाद हे प्रमुख दावेदार शहर मानले जात आहे. याच महत्त्वाकांक्षेने शहराच्या क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात येत आहेत. सध्या निर्माणाधीन असलेले सरदार वल्लभभाई पटेल स्पोर्ट्स एन्क्लेव्ह हे त्याचेच एक उदाहरण आहे.**

### जागतिक दर्जाच्या सुविधा

**राष्ट्रकुल स्पर्धेचे स्वरूप खर्चात कपात करण्यासाठी मर्यादित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि हॉकी यांसारख्या प्रमुख खेळांना वगळण्यात आले आहे. तथापि, जर २०३० चे यजमानपद भारताला मिळाले, तर या स्पर्धेत भारतासाठी पदक मिळवून देणाऱ्या सर्व प्रमुख खेळांचा समावेश असेल, असे आयवोएने स्पष्ट केले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसिद्ध झालेल्या पत्रकानुसार, अहमदाबादला यजमान शहर म्हणून निवडण्यामागे ठोस कारणे आहेत.**

# स्टार क्रिकेटर नितीश राणाचा राडा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



दिल्ली प्रीमियर लीग २०२५ एलिमिनेटर सामन्यात वेस्ट दिल्ली लायन्सचा कॅप्टन नीतीश राणाने जबरदस्त बॅटिंग केली होती. साऊथ दिल्ली सुपरस्टार्स विरुद्ध त्याने केवळ ४२ चेंडूत शतक ठोकून आपल्या टीमला या लीगच्या क्वालिफायर–२ मध्ये पोहोचवलं. या दरम्यान त्याने १५ सिक्स मारले. इंडियन प्रीमियर लीग २०२५ मध्ये नितीश राजस्थान रॉयल्सकडून खेळतो. त्यांनी डीपीएल २०२५ लीगमध्ये साऊथ दिल्लीच्या एकाही गोलंदाजाला सोडलं नाही. त्यांची जोरदार धुलाई केली. साऊथ दिल्ली सुपरस्टार्जचा स्पिनर दिग्वेश राठी सोबत त्याचे भांडण झालं. विषय मारहाणीपर्यंत जाऊन पोहोचला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय.

दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये हा एलिमिनेटरचा सामना झाला. साउथ दिल्ली सुपरस्टार्जने पहिली बॅटिंग केली. त्यांनी २० ओव्हरमध्ये ५ विकेटवर २०१ रन्स केल्या. प्रत्युत्तरात वेस्ट दिल्ली लायन्सने १७ चेंडू राखून सात विकेटने सामना जिंकला. वेस्ट दिल्लीचा कॅप्टन नीतीश राणाने केवळ ४२ चेंडूत शतक ठोकून हा सामना एकतर्फी केला. त्याने ५५ चेंडूत ८ चौकार आणि १५ षटकारांसह नाबाद १३४ धावा केल्या. त्याने साउथ दिल्लीच्या गोलंदाजांची भरपूर धुलाई केली. नीतीशने दिग्वेश राठीच्या एका ओव्हरमध्ये तीन सिक्स मारले.या ओव्हरमध्ये दिग्वेश राठीने २० धावा दिल्या. राणाशिवाय विकेटकीपर फलंदाज क्रिस यादवने २२ चेंडूत १ चौकार आणि ३ षटकारांसह ३१ रन्स केल्या. मयंक गोसाईंने नाबाद १५ रन्स केल्या. साउथ दिल्लीकडून बेनीवालने दोन विकेट घेतल्या. त्याआधी साउथ दिल्लीच्या फलंदाजांनी शानदार बॅटिंग केली. वेस्ट दिल्ली लायन्सच्या इनिंग दरम्यान नीतीश राणा वेगाने धावा करत होता. त्याने साऊथ दिल्लीचा गोलंदाज राठीच्या गोलंदाजीवर वेगाने धावा बनवल्या. या दरम्यान त्याने एका ओव्हरमध्ये ३ सिक्स मारले. त्यामुळे दिग्वेश राठी चिडला होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)